
# आषाढ-श्रावण



REFBK-0025986
REFBK-0025986

कवी यशवंत पारखी.

संदर्भ काव्य
२५९८
२५९८६
१०१९८

श्री. गणेश साहित्यधारा-३

आषाढ-श्रावण (कवितासंग्रह)

यशवन्त गणपतराव मारखी

प्रकाशिका

सौ. विजया यशवन्त मास्खी
३, निनाद, कोपररोड, डोंबिवली (पश्चिम)
जिल्हा- ठाणे.

आषाढ शुध्द प्रतिपदा शके १९११
महाकवि कालिदास दिन ४ जुलै १९८९

हस्ताक्षर:-

विलास विजयराव राणे

रेखाचित्रे व सजावट

श्री. विजयराव राणे

मुखपृष्ठ छायाचित्र:

श्री. जगदिश अगरवाल

मुखपृष्ठ छपाई:-

जॉली प्रिन्टर्स

मुद्रण:-

श्री. कुट्टी

किंमत:

रु. १५-००

२५९८६
काव्य

# श्री त्रिंबक निळकंठ उर्फ बाबाजी आंभोरकर

जन्म १९०२

- ★ कॉंग्रेस चळवळीत भाग. त्यामुळे शिक्षण खंडित.
- ★ मॅट्रिकनंतर भंडारा कलेक्टोरेट मध्ये दोन वर्षे नोकरी.
- ★ त्यानंतर त्यागपत्र देऊन पवनी येथे नगरपरिषदेत सेक्रेटरी.
- ★ पवनीत दरम्यान कै. डॉ. हेडगेवारसह संघस्थापनेत सहकार्य.
- ★ १९३९ संघप्रयोग नामक शुध्दिसंघटन विषयक सामाजिक कादंबरी लिहून प्रसिध्द केली.

- ★ १९४४ ते ४५ मिलिटरीतून सेवा.
- ★ मिलिटरीतुन डिस्चार्ज घेतल्यावर गव्हर्मेंट मन्रो हायस्कूल भंडारा येथे शिक्षकाची नोकरी.
- ★ १९६२ मध्ये हेडमास्तर पदावरुन निवृत्ती.
- ★ तेव्हापासून भंडारा येथे सतत मॅट्रिक ते बी.ए. चे इंग्रजीचे क्लासेस सुरु.
- ★ हाडाचे शिक्षक. हजारो मुले-मुली हाताखालून शिकून आज मोठ्या हुद्यावर आहेत.
- ★ आजही ८५ वर्षाच्या वयांत क्लासेस सुरु असतात.
- ★ इंग्रजी शिकविण्यात हातखंडा.



गुरुवर्य श्री० त्रिं० नि० आंभोरकर

यांचे चरणीं समर्पण

त्या तुंच वर्षल्या ऊरूत्व [illegible]घुनी
मी जाइन सारे पर्वत ओलांडूनी
ती किरणशलाका तुझाच रे तळहात
माथ्यावर ओती अमृत- आशीर्वाद.

REFBK-0025986

यशवंत पारखी

# प्रास्ताविक

डॉ. प्रा. रमेश तेंडूलकर

कवितेच्या सीमा आखणं, निश्चित करणं कठीण! कवितेचा छंद आयुष्यात कोण कशा प्रकारे जोपासतो याचं गणित मांडणं हे तर त्याहूनही कठीण! सुमारे वीस एकवीस — वर्षांपूर्वी डोंबिवलीच्या काव्यरसिक-मंडळाने आयोजित केलेल्या वार्षिक संमेलनात कवी यशवंत पारखी यांची प्रथम गांठ पडली तेव्हा माझ्या मनाची काहीशी अशीच प्रतिक्रिया झाली. अनेक तरुण कवी आणि रसिक त्या संमेलनाला जमले होते. नव्या-जुन्या — कवितेवर चर्चा झडत होत्या. मला वाटतं चंद्रकांत खोत यांचा 'मर्तिक' हा काव्यसंग्रह त्याच सुमारास प्रसिद्ध झाला होता. त्या निमित्ताने कवितेतील या प्रवृत्तीच्या अविष्कारासंबंधी उलटसुलट तीव्र प्रतिक्रिया व्यक्त केल्या जात होत्या. श्री पारखी त्यांत-कोठेही नव्हते. म्हणजे कोणत्याच बाजूची प्रतिक्रिया व्यक्त करीत नव्हते. 'पुष्पगंधा' हा त्यांचा पहिला कवितासंग्रह त्याआधी दोनतीन वर्षे तरी प्रकाशित झालेला होता. त्याच्या प्रस्तावनेत एक वाक्य आहे; "नवीन काव्यप्रकाराचा (नवकाव्याचा) वाचक असूनदेखील ती धाटणी माझ्या कवितांनी घेतली नाही, याची मला जाणीव आहे." पण आतां त्यांना त्या प्रकारची खंत जाणवत नसावी. नवीन कवितेचा आस्वाद — घेतानाही स्वतःच्या विशिष्ट काव्यवृत्तीत आत्मनिमग्न वृत्तीने ते रंगून गेलेले — दिसत होते. नम्रतेने पण तितक्याच आत्मविश्वासाने आपली काव्यवृत्ती सम-कालीन कवितेत बसणारी नाही याची स्पष्ट जाणीव तेव्हा त्यांना कदाचित — असेल किंवा नसेलही. पण आपल्या काव्यवृत्तीशी ते मनोमन निष्ठेने तल्लीन झालेले दिसत होते. त्याच वृत्तीने कविता वाचीत होते व त्यांना त्यांचा एक — रसिकवर्ग त्यांतून मिळत होता.

"उत्स्फूर्त कल्पनांनी जो कोणता आकार धारण केला तो अत्यंत प्रामाणिकपणे मी रसिकांसमोर ठेवण्याचे धाडस करीत आहे." असं 'पुष्पगंधा'च्या — प्रास्ताविकात त्यांनी म्हटलं होतं. कविता ही जीवनाला उदात्त आशय देणारी — मानवी मनाची एक उत्कट आणि गूढ अवस्था आहे, एक उत्कट संस्कार आहे अशीच श्री पारखी यांची कवितेविषयीची धारणा असावी, असे त्या उद्गारातून सूचित होत होते. याच श्रद्धेतून श्री पारखी यांनी एखाद्या व्रतवैकल्यासारखी आपल्या कवितेची जोपासना केली आहे असे तेव्हा माझ्या मनात आले.

वर उल्लेखिलेल्या संमेलनानंतर पंधराएक वर्षांनी 'रक्षाबंधन' या त्यांच्या दुसऱ्या काव्यसंग्रहाच्या प्रकाशन समारंभाला मी हजर राहिलो तेव्हा तर माझी वरील समजूत पक्कीच झाली. आपल्या घरी मोजक्याच रसिकांच्या उपस्थितीत, कन्येचा विवाह असावा अशा मंगल वातावरणात त्यांनी हा समारंभ साजरा केला. त्यांनीच हा दृष्टान्त योजून प्रास्ताविक भाषणांत — सांगितले की मुलीच्या लग्नासाठी पैसे जमवावेत तसे पैसे जमवून मी काव्य संग्रह प्रसिद्ध करीत असतो. त्याहूनही महत्वाची गोष्ट म्हणजे 'रक्षाबंधन' — या काव्यात त्यांनी 'मानलेल्या' बहिणीच्या प्रेमातून स्फुरलेली भावकथा ग्रथित केली होती. हे मुळात रक्ताचे नाते नसल्यामुळे लोकांची निंदा, मैत्रीचा विपर्यास, समाजात बेअब्रू होईल या भीतीने 'बहिणीने' तोडलेले नाते, त्यातून विरह, 'तू — तोडिले तरीही मी तोडणार नाही अपुले पवित्र नाते मी मोडणार नाही' या दृढ — वृत्तीने भावाने घेतलेला बहिणीचा ध्यास, त्या ध्यासातून तिचे स्वप्नात होणारे दर्शन, अखेर 'चंद्र-पृथ्वीच्या नात्यासारखं ते नातं अविनाशी आहे' याची ओळख होऊन बहिणीची होणारी प्रत्यक्ष भेट अशा विविध अवस्थांचे चित्रण करीत ही भावकथा साकार होते. या भावकथेचे सौ उषाताई पेंडसे यांनी सहृदय वृत्तीने केलेले रसग्रहण या संग्रहाच्या शेवटी जोडले आहे. त्यांत त्या म्हणतात त्याप्रमाणे प्रणवाचे मोरपीस आणि अनाहत स्वरांचा साज मागणारी ही कविता (अखेरच्यां टप्यावर) जरा अध्यात्माकडे झुकल्यासारखी वाटते..... जीवाला असलेली शिवाच्या भेटीची आस द्वैत संपून अद्वैतात सफल होते..... सुशांत, प्रेममय केवळ अद्वैतात ही आनंदयात्रा संपते. उरतं ते केवळ सोलीव, गाळीव, निखळ 'प्रेम.' ——— महाराष्ट्र कवी यशवंतांच्या 'जयमंगला' या खंडकाव्याप्रमाणे सुट्या सुट्या भावकवितांतून ही कथा गुंफिली गेली आहे.

श्री पारखी यांच्या कवीवृत्तीचे मनोधर्म; संस्कार आणि घडण जाणून घेण्याच्या दृष्टीने 'रक्षाबंधन' हे त्याला सौ. पेंडसे यांनी जोडलेल्या रसग्रहणासह लक्षात घेतले पाहिजे, असं मला वाटतं.

आतां प्रसिद्ध होत असलेल्या त्यांच्या 'आषाढ-श्रावण' या संग्रहात त्यांच्या १९६६ ते १९८४ या कालावधीत लिहिलेल्या सुमारे सहासष्ठ कविता समाविष्ट करण्यात आल्या आहेत.

एकादी कविता अपवाद केल्यास या साऱ्या स्फुट रचना आहेत. या रचनेत विविधता — आणि वैचित्र्य आहे. ते आशय आणि अविष्कार अशा दोन्ही अंगानी प्रगट झाले आहे.— यांतील सतरा एक कविता आकाशवाणीवरून 'भावसरगम', 'साहित्यसौरभ' यासारख्या कार्यक्रमांतून गायिल्या व वाचल्या गेल्या आहेत. वाचकांना अपरिचित असलेल्या — एखाद्या कोनाकोपऱ्यातल्या अंकापासून, मान्यताप्राप्त, दर्जेदार मासिकापर्यंत अनेक नियतकालिकातून त्यांच्या कविता प्रसिद्ध झाल्या आहेत. सत्यकथेसारख्या प्रतिष्ठित दर्जेदार मासिकातूनही एकाददुसरी कविता प्रसिद्ध झाली आहे. हे सारं त्यांच्या कवितेतील 'विविधतेचे' आणि वैचित्र्याचेच एक गमक म्हणता येईल.

आज कविता सर्रास मुक्तशैलीतून लिहिली जात असताना श्री. मारखी हे जुनी अवघड अक्षरगणवृत्ते, जाती, छंद यांचा मोठ्या प्रेमाने आपल्या रचनेत आदर करताना आढळतात ही गोष्ट अभिजात कवितेवर प्रेम करणाऱ्या रसिकांना सुखद, आनंददायक वाटावी अशीच आहे. यामागे जुन्याला चिकटून राहण्याची कर्मठ वृत्ती नाही, तर काव्याविष्काराच्या निरनिराळ्या वाहनांसंबधी त्यांना सारखेच वाटणारे प्रेम आहे. यामुळेच भावगीतासारख्या रचनेपासून (आली वर्षत श्रावणधारें) तार्किक, बीजगणिती रचनेपर्यंत ('मी + तूं') सर्व अविष्कारांची गंमत ते स्वतः चाखतात व रसिकानांही चाखायला लावतात. या अविष्काराला सर्वत्र लाभलेला लवचिकपणा हा या त्यांच्या वृत्तीतुन निर्माण झाला असावा असे वाटते.

श्री मारखी यांच्या काव्यरचनेला सर्वच रंगानी एक तऱ्हेचा आकर्षक गडदपणा असल्याचे जाणवते. श्रवणसुलभ शब्दपंक्ती, अर्थगौरव साधणारी पदावली, ठसठशीत प्रभावी लय, गतिमान इंद्रियगोचर रुपके इत्यादी अनेक घटकांचा तो एकत्र जाणवणारा परिणाम असतो. रंग-नाद संवेदनांचा प्रत्यय देणाऱ्या त्यांच्या प्रतिमांना ठसठशीतपणा बरोबरच लोकाविष्काराच्या जातीचा एक तऱ्हेचा मजेदार अनपढपणा असतो. लखलखती या रूढ शब्दप्रयोगाऐवजी

लख लख लखती विजा चमकती
गडगडती घनमाला
अवचित पहिला पाउस आला
– धो धो पाउस आला

असं ते लिहितात तेव्हा त्या सगळ्या चित्रालाच त्या अनपढपणातून एक तऱ्हेचा उठावदारपणा येतो. याचप्रकारचा गुणधर्म असलेली कल्पकता त्यांना लाभली आहे व ती आशय अभिव्यक्तीचे निरनिराळे भाव, रुप आणि रंग खुलवायला त्यांना सहाय्यभूत होते सहज हाती आलेल्या या काही उदाहरणांवरुन त्याची कल्पना येईल.

दिशा सवाष्ण न्हालेल्या केस मोकळे सोडून
वीज भाविण नाचते हाती कापूर घेउन
('श्रावण आरती')

हा सूर्य तोवरी मी थोडे हसून घेतो
('माझेच दैव खोटे')

ज्या शिळेतुन तुला घडविले
त्याच शिळेचा मीही फत्तर
ह्याच जन्मीचे अपुले नाते
कसे मिटावे मधले अंतर ?
कुशीत एका जन्म आपुला
परि दैवाचे उलटे अक्षर
ज्या शिळेतुन तुला घडविले
त्याच शिळेच्या मीही फत्तर
(फत्तर)

अंधाराने शाप दिला पण सूर्याचे वरदान मला
पायधुळीला वर मिरवावुन नक्षत्राचा मान दिला
सूर्याचे वरदान मला

... ठिगळ नेसल्या आयुष्याला पितांबराचा वाण दिला
('अंधाराने शाप दिला')

'काळी बाभूळ सांगते' मधील निसर्गाचे चेतनीकरण करणारी ठसठशीत रुपकें, 'वाट चुकलेली लाट' मधील उपरोध, 'जांभळमीरा' मधील भावदर्शन या साऱ्या चित्रणातून त्यांच्या कल्पकतेचे विविध रंग पाहायला मिळतील. 'खरचटलेले पाय, बरें केलेस केशवा', 'झालो पुरा पुरा नंगा' इत्यादी कवितांतून, नवकाव्याची जाणीव व्यक्त करण्याची शैली आणि धाटणी त्यांनी कशी आत्मसात केली आहे, त्याची कल्पना येईल. थोडक्यात, कोणत्याही प्रकारच्या एकेरीपणाचा अट्टाहास त्यांच्या वृत्तीला चिकटलेला नाही हेच यावरुन स्पष्ट होईल.

या संग्रहातील काही कविता 'आषाढ-श्रावण' हे संग्रहाचे नाव —

सार्थ करणाऱ्या भारलेल्या भावनांचे व वृत्तीचे गडद, गहिरे रंग गेय लयीतून उधळणाऱ्या आहेत, तर काही मुक्तशैलीतून वास्तवाचे विदारक दर्शन घडविणाऱ्या आहेत. काही कवितांतून बालमनाची स्वप्नसृष्टी त्यांनी रंगविली आहे, तर काही कविता थोर राष्ट्रीय व्यक्तींना शाहिरी वंदन करणाऱ्या आहेत. कोठे अंतर्मुख, चिंतनाचा स्पर्श असलेली वृत्ती तर कोठे 'जन्मोजन्मींची' वेदना जपण्याची तळमळ दिसून येते.

या विविधतेत आणि वैचित्र्यात कोठे तगमग, विदारक वास्तव, दारुण मनोभंग इत्यादी भाव प्रकट झाले असले तरी प्रारंभीच म्हटल्याप्रमाणे जीवनाला उदात्त आशय देणारी स्फूर्ती याच दृष्टीने ते कवितेकडे पाहतात तिची जपणूक करतात.

श्री.मारस्वी यांची कविता तसं पाहिलं तर गुणदोषांचे मिश्रण आहे. अवघड अक्षरगणवृत्ते, छंदाचा वापर करतांना वृत्तदोष, ऱ्हस्वदीर्घाची कर्णकटु ओढाताण 'रंगबिरंगी' सारखे सदोष (आणि सौंदर्यहीनही) शब्दप्रयोग, नव्या प्रतिमांना खेटून स्थूल सांकेतिक कल्पनांची योजना अशाप्रकारचे दोष त्यांच्या कवितेतून आढळतात. यापूर्वी अनेकांनी ते तपशीलवार दाखविले आहेत. पण आज इतकी वर्षे श्री मारस्वी निष्ठेने काव्य लिहीत असतांना आता त्यांच्या कवितेतील दोषांची चिकित्सा करीत बसण्याऐवजी तिच्यातील गुणांचेच कौतुक करावे, असे मला वाटते. शिवाय त्या दोषांमुळे तिच्यातील आवाहकता कमी झाली आहे असे होत नाही, हीच गोष्ट मला इथे महत्वाची वाटते.

आषाढ-श्रावणातल्या सरींसारखी त्यांची कविता सरसरत अवतरते. कधी आषाढातल्या सरींसारखी कोसळते, घनदाट भाव तिच्यात दाटतात तर कधी श्रावणातल्या ऊनपावसाच्या खेळांसारखे गतिमान प्रतिमांतून भावना-संवेदनांचे इंद्रधनुष्य तिच्यात उमलते! ...'आषाढ-श्रावण' हे काव्यसंग्रहाचे नाव सार्थ करते!

डॉ. प्रा. रमेश तडळकर
मराठी विभागप्रमुख
कीर्ती महाविद्यालय
दादर

# अनुक्रमणिका


१. आली वर्षेत श्रावणधार ---------- १
२. श्रावणआरती ---------- २
३. माळरानही खुदकन हंसलें ---------- ३
४. श्यामलराणी ---------- ५
५. नभ काळेशार ---------- ९
६. पावसांत घर जळत असताना ---------- १०
७. जरा जपून पाय ठेव ---------- ११
८. भरपावसांत ---------- १२
९. धो धो पाऊस आला ---------- १३
१०. काळी बाभूळ सांगते ---------- १५
११. ये ---------- १७
१२. मूर्त प्रियतम व्हावें ---------- १९
१३. युक्त्या ---------- २०
१४. फुटलें धरण ---------- २१
१५. वाट चुकलेली लाट ---------- २२
१६. दिशा फितूर झाल्या ---------- २३
१७. माझेच दैव खोटे ---------- २४
१८. समुद्राचा तोल गेला तेंव्हा ---------- २६
१९. मी + तू ---------- २७
२०. मी तुला माहित आहे ---------- २८
२१. वेणा ---------- २९
२२. कोण तू ? ---------- ३०
२३. अमर्याद रंगामध्ये नाहतो ---------- ३१
२४. कुणी येणार म्हणून ---------- ३२
२५. जांभळे पीस ---------- ३३
२६. तुझं येणं जाणं ---------- ३४
२७. बिलोरातून ---------- ३५
२८. चंद्र जशी डुलें ---------- ३६
२९. चैत्र होता तोंवरी ---------- ३७
३०. जनरीत या जगाची ---------- ३८
३१. ललाटलेख ---------- ३९


३२. गंध कसा विसरावा ? ........ ४०
३३. अपूरे स्वप्न ........ ४१
३४. आयुष्य ........ ४२
३५. मृत्यु ये ........ ४३
३६. फत्तर ........ ४५
३७. रात्र म्हणाली अंधाराला ........ ४६
३८. प्रियतम दर्शन ........ ४९
३९. वारी वारी विमदां वारी ........ ५०
४०. यमुनेकांठी ........ ५१
४१. सौजुल्यास ........ ५२
४२. वळत वळत गाडी कशी ........ ५३
४३. मानवतेच्या धर्मदीपका ........ ५४
४४. भारत प्रियदर्शिनी ........ ५५
४५. आक्रमकांनो ........ ५६
४६. मानव तितुका एक ........ ५८
४७. श्रमवीरांनो ........ ६०
४८. पर्याय ........ ६१
४९. उन्हें एवढी कळली नसती ........ ६२
५०. वेदनांनो या ........ ६३
५१. हे नभा ........ ६४
५२. बरें केलेंस केशवा ........ ६६
५३. झालो पूरा पूरा नंगा ........ ६८
५४. दीप दे ........ ६९
५५. मी सारे तुझिया चरणीं वाहिले ........ ७०
५६. सुखाचे सोबती ........ ७१
५७. शोधूं कुठें रे तुला ? ........ ७२
५८. खरचटलेले पाय ........ ७३
५९. मला कशाला दगड मारितां ? ........ ७४
६०. अंधाराने शाप दिला ........ ७६
६१. आशीर्वाद ........ ७७
६२. रसिकांनो ........ ७८



# आली वर्षत श्रावणधार

आली वर्षत श्रावणधार
डोंगरमाथ्यावरी रंगला मेघांचा मल्हार
मुरलीधर घनश्याम सावळा
संजीवन स्वरधार वर्षला
धरती राधा म्हणे, "ओत रे तृषार्त मी अनिवार-"
कटिवर घेउन अमृत-घागर
सुरलोकीच्या श्यामा सुंदर
निळ्या अंगणीं गिरक्या घेती उधळित प्रेमतुषार
दुंदुंब सरिता, ओढे, निर्झर,
भिजली शेतें, भिजले डोंगर,
वरुणाचा रथ होउनि आला, वाऱ्यावरती स्वार.
वृक्षलतांची हिरवी सळसळ,
माड, नारळी, पोफळ, पिंपळ.
झावळ, झापा झुकवुन करिती वंदन वारंवार.
पाण्यामधुनी टक्मक बघते,
मृदुल तृणाचे हिरवें पातें,
माळरानही नटले घालुन रानफुलांचे हार.
मयुरांनो, या बांधा घुंगुर
दिशादिशांचे गायन सुस्वर,
मेघांचा लयताल, चालला तडितेचा झंकार.
फेर धरा, या नृत्य करा रे,
हा जयनोत्सव, मंगल गा रे,
सस्यश्यामला वसुंधरेचा आज करुं सत्कार,
आली वर्षत श्रावणधार,
डोंगरमाथ्यावरी रंगला मेघांचा मल्हार

"भावसरगम" आकाशवाणी, मुंबई जुलै १९७१
संगीत- दत्ता डावजेकर ●●● गायक - रामदास कामत



# "श्रावणआरती"

आला सांवळा श्रावण बारा मासांचा सम्राट,
मेघ तुतारी फुंकतो वारा धांवतो सोसाट.
निळे शेमले बांधून उभे डोंगर थाटांत,
ओली हिरवळ नेसून वाट लाजते घाटांत,
नदी कुंवार बावरी तिची नजर सैराट,
मेघ तुतारी फुंकतो---------
पाणी पिऊन शेताला आली शोंवळ क्षणांत,
आणी झिंगून पडले माड बाबूंच्या बनांत,
एका बारक्या ओढ्याचे पोट सुटले विराट,
मेघ तुतारी फुंकतो--------
गाई वासरें खिल्लार आलं गोठ्यांत भिजून,
मुकी पांखरें भिजून गेली पंखांत निजून
खुळा वेड्या पाचोळा घाली गोंधळ पिसाट
मेघ तुतारी फुंकतो --------
दिशा सवार्ष्णा न्हालेल्या केस मोकळे सोडून,
वीज भावीण नाचते हातीं कापूर घेऊन,
भोळ्या भोटूशा मातीचे झाले उजळ ललाट,
मेघ तुतारी फुंकतो-------
गर्जे आकाशी चौघडा, झांजा लाटांच्या वाजती,
टाळ्या पानापानातून चाले श्रावण- आरती,
आल्या लेझीम नाचत जलधारा पाठोपाठ,
मेघ तुतारी फुंकतो--------

'वाङ्मय शोभा' श्रावण-अंक ऑगस्ट १९६१
भावसरगम, आकाशवाणी केन्द्र मुंबई- ऑगस्ट १९८३

# माळरानही खुदकन हंसलें

माळरानही खुदकन हंसलें
      पांघरुनी मठ हिरवा शेला,
जळवंतीने हातीं दिधला
      मृदुल फुलांचा रंगित झेला.
निळवंतीचीं रेशिम स्वप्नें
      मिटून डोळे बघती डोंगर,
हळूंच मिटले कष्टे उन्हाचे
      स्पर्शीत होते जरतारी कर.
सळसळ पिंपळपानांवरती
      क्षणभर थांबे वाऱ्ळवारा,
आज यायचें नव्हतें हेंही
      विसरुन आल्या श्रावणधारा.
जरा थांबले श्वास कळ्यांचे
      वाऱ्याला येतांना पाहुन;
वरवर रुसवा शेवंतीचा
      अंतर्यामीं आली बहरून.
नकळत आलें जास्वंदाला
      एक पोपटी हळवें स्पंदन;
नसलें कांही मनांत नसतां
      हंसे अबोली उगाच लाजुन.
स्वप्नबावरी कर्दळ घाली
      कुंपण कांठावरती वर्दळ,

लाजरिच्या रोपाने चटकन
पुसलें डोळ्यांमधलें काजळ.
जाईच्या गालांशी बिलगुन
गुलाब म्हणतो, "कळलें का तुज?
कुणास सांगू नकोस राणी
पावसांत मोहरले हितगुज –"
अंगणांतल्या तुळसीने पण
तृप्त मनाने सर्व ऐकिले;
कुरवाळित मग बाभुळ काळी
माळरानही खुदकन हसलें.



वाङ्मय वाङ्मय शोभा
श्रावणअंक, ऑगस्ट १९७० 'साहित्य सौरभ'
आकाशवाणी, मुंबई ११ जून १९७२



# श्यामलराणी

विसरेन कसा ती श्रावणांतली रात्र ?
आठवतां पुलकित होतीं गात्रं नि गात्रं;
वाटतें खरोखर सुरवद स्वप्न पडलेलें,
तें आठवण्याचें पिसें मला जडलेलें.

अंधार कोंदला गर्द आसमंतात,
कडकडे विजेचा चाबुक आकाशांत,
चौफेर नाचती कोसळत्या जलधारा,
सन्नाट धांवतो डोंगरांतला वारा.

निर्मनुष्य रस्ता गुडघ्यावरती पाणी,
अन घराघरांतुन जागें नव्हतें कोणी,
सांभाळित अपुली छत्री डोक्यावरती,
टाकिली पावलें घरीं परतण्यासाठी.

वळणावर येतां अवचित तूं दिसलीस,
सरवशिरवांत श्रावणधारांतुन भिजलीस.
चाहूल लागतां नजर तुझी वळलेली,
डोळ्यांना भिडतां डोळे ओळख पटली.

शाळेंत एकदा खूप भांडलो होतों,
तेंव्हांच अबोला धरून आपण होतों.
ती आज जाहली एकाएकी भेट,
मी हंसलों, किंचित तुझे विलगले ओंठ

"भिजलीस किती तूं ? घरीं जायचें? चल ना,
किति वाट पाहशिल ? पाउस हा थांबे ना."
क्षण एक पाहिलें भयकंपित नजरेनें,
अन रुकार दिधला हलवुनिया मानेनें.

उचलून आपुले आंचे थोडे वरती,
आलिस पुढें, मी छत्री धरली पुढती,
हळु हळु निघालो दाखविल्या वाटेने,
चौफेर कोसळे पाउस निर्दयतेने.

हृदयांत माजली खळबळ एक विचित्र,
ह्या भलत्या वेळीं दोघेजण एकत्र,
चोरून पाहिलें नजर तुझी चुकवून,
नयनांत अनाकलनीय भाव गोठून.

सुकुमार सांवळी काया ओली चिंब,
केसांत रेशमी मोत्यांपरि अणु थेंब,
गालांवर उतरे चंदेरी जलधार,
वाटलें टिपावी अधरांनी हळुवार.

कळिदार नासिका नयनें दोन विलोल,
ओठांतुन अस्फुट कुंदकळ्यांची माळ
भाळावर हिरवी चंद्रकोर गोंदून,
वदनावर भोळ्या भावकळ्या उमलून,

कडकडून आला लोळ विजेचा वरती,
शतसूर्य तळपले मिटल्या डोळ्यांपुढती,
कळ एक भयाची उठली हृदयांतून,
कर गुंफुन आलो परस्पर्श बिलगून,

निपटून आपुल्या केसांवरचे पाणी,
धरिलेंस टोंक पदराचें दातांमधुनी,
म्हटलेंस, " थांबु या पिंपळपारावरती —
अन इतुस्थ त्रास हा तुम्हांस माझ्यासाठी "

स्वर मंजुळ घंटा किणकिणली कानांत,
पारावर आलो केंव्हा त्या नादांत
कळलें न मला; तूं फोडलीस किंकाळी,
वळवळती दिसतां पुढे शेपटी काळी.

कर घट्ट लपेटुन माझ्या कमरेभंवती,
मारिली मिठी शिर टेकुन वक्षावरती,
दचकून जरासें नेले तुज बाजूला,
थरथरला अवघा देह तुझा भ्यालेला,

"भिवुं नकोस–" फिरता पाठीवरती हात,
आकाश सांवळे माझ्या करपाशांत,
क्षण एक पाहिलें बावरल्या नयनांत,
कवळून टेकिलें ओठांवरती ओठ.

तव ऊर धडधडे जाणवलें हृदयांस,
वेगांत चालला संथर श्वासोच्छ्वास,
मी धीर बांधिला कंपित तव देहास,
तूफान थांबलें, ओसरला पाऊस.

उचलली पाउलें घरीं परतण्यासाठी,
कर ठेवुन तुझिया डाव्या स्कंधावरती,
लगटून चालता तूही मज बेहोष;
क्षण धुंद वर्षला बहराचा मधुमास.

त्या क्षणीं वाटलें, एक अनामिक नातें,
शतजन्म शोधुनी साकारुनियां येतें,
परिचीत, प्रेम वा लग्नबंधने सारी—
तोडून घेतसे अंतर उंच भरारी

"हं इथेंच थांबा समोर तें घर माझें—
येउन माझिया सन्मुख वदलीस वाचे.
मुख झांकुन अपुले माझ्या दोन करांत,
गदगदून आला हुंदका तव कंठात.

"विसरुन जाउया सारे तें घडलेले–"
म्हटलेंस; अचानक वेगें पाउल वळलें.
मी सुन्न उभा जणुं निश्चल दगडी खांब
ओंजळीत घेउन तुझेच अश्रू-थेंब.

ठेवून तुझे ते अश्रूं ओठांवरती
परतलो एकटा अपुल्या मार्गावरती
खोलीत येऊनी दिले अंग झोकून
अन स्वप्न उद्याचे फुलले रात्रीतून.

मुद्दाम भेटण्या आलो प्रातःकाळी,
अन साद घातली येउन दाराजवळी,
तो एक वयस्कर पुरुष म्हणाला, "यावें—
अन कोण पाहिजे तुम्हांस तें सांगावे?"

भिरभीर आंतल्या घरामध्ये पाहून,
मी म्हटलें त्यांना नम्रपणें लाजून,
"मज काल भेटली, पावसांत भिजलेली,
ती तुमची कन्या श्यामल मी पोचवली"—

निस्तब्ध राहिला क्षणभर आवासून.
अन पत्नी पाही दारांतुन वाकून.
ती तुम्हां भेटली, खरेंच ? नाही खोटें
गतवर्षी मेली, दुःख आमुचे मोठे.

अन काल जाहले वर्ष तिला जावून,
एकुलती कन्या दुःख अम्हां देवून,
हें चित्र बघा किती गोड रूप होतें हो ?
ती हीच भेटली काल तुम्हाला का हो ?—

आघात जाहला डोक्यावर मी सुन्न,
सर्वांग जाहलें बधीर मन उद्विग्न;
ती तूंच श्यामले, चित्र तुझे ते होते,
तूं जिवंत अथवा पिशाच्च माहित नव्हतें.

मी उठलो धांवत आलो मारावरती,
तो भिंमळ होता अपुल्या जागेवरती,
अन तुझी पावलें उठलेली चिखलांत,
उचलून घेतली माती दोन करांत.


लाटेसम आलिस आणिक तूं गेलीस,
भिजलेस श्यामले माझ्या आयुष्यास.
मन उन्मन होतें आणिक वेडेवेडे,
वेडांत भिजावे पुन्हा वाटते थोडे,

दरवर्षी येतें अशीच श्रावणधार
हृदयांत आळवित धुंद राग मल्हार;
स्वप्नांत पुन्हा ती येतें श्यामलराणी,
बेभान होउनी गातो तिची विराणी.

"कांचन"
दिवाळी वार्षिक ८४

# नभ काळेशार .....

नभ काळेशार,
श्रावणाची धार,
माझी वारंवार ~ हांक तुला.
वीज कडकडे,
मेघ गडगडे,
जीव कसा उडे ~ भेटीसाठी.
वादळाची रात
हातीं फुलवात
तुझें गीत गात ~ आलें आतां.
कंकणांचा नाद,
घुंगुराची साथ.
ओली पायवाट ~ चिखलाची.
वाटेवरी काटे
गहिंवर दाटे
मला भीती वाटे ~ अंधाराची
बांधुनियां माठीं
लाज तुझ्यासाठी,
पूर नदीकांठी ~ कशी येऊं?
वाट पाहशील,
आणि रुसशील,
प्रीत म्हणशील ~ खोटी खोटी.




# पावसांत घर जळत असतांना

पावसांत घर जळत असताना
तूं आंत यायला नको होते.
आलीस, ओलीचिंब पेटलीस, पेटवत राहिलीस.
पाऊस थांबल्यावर आग विझेल काय ?
आग विझल्यावर तरी पाऊस थांबेल काय---?
भेगाळल्या भिंतीला टेकून
केसांत गजरे माळायला तुला जमणार नाही.
अन फोड आलेल्या हातांनी तुला बाहेर
नाही, नाही काढवत.
दार कोसळेस्तोवर धुराच्या लोटांत
करपल्या ओठांचा शिणगार उरकून घे.
अन.
लळलळत्या ज्वाळांनी तुझी पायवाट तापण्यापूर्वीच
चूपचाप
निघून
जा------------.



'सत्यकथा' जाने १९७१
'साहित्य सौरभ' आकाशवाणी मुंबई जून १९७२



# जरा जपून पाय ठेव

मुसळधारांनी क्षितिज निसरडे
झाले. ।जरा जपून पाय ठेव.
कपारीत लपून किरवाणी
गाणाऱ्या रातकिड्यांना
तुझे घुंगुर-बांधले केशरतळवे
दिसायला नकोत.
तुझे मेंदीरंगले नख माझ्या
घरट्याच्या वळचणीला
नीट खोचून ठेव.
एक शेवाळले गीत
सोलून काढीन म्हणतो.
पण, ----------
ढगांत हरवलेले माझे
पंखभर आकाश शोधायला
आज परत विसरशील काय -----?

'माणूस' जानेवारी १९७२
साहित्य सौरभ, मुंबई आकाशवाणी ११ जुलै ८३

# भर पावसांत


भरपावसांत आतां येऊं नकोस राणी
आषाढ-श्रावणाची गाऊं नकोस गाणीं

आलिं फितूर वारे गेले रुसून तारे
धारांतल्या खुणांचे खुरटे निळे पिसारे
भरल्या सरोवरांना सांगू नकोस पाणी
भरपावसांत आतां -----

निढावल्या नभाचा करती दिशा पुकारा
बदनाम जाहलेला लपतो जळीं किनारा
खडकापरी जिभांची झाली बधीर वाणी
भरपावसांत आतां -----

विद्युल्लतेस विळखा पडला असे ढगांचा
सुळका उभा तरी हा मग्रूर पर्वतांचा
चैत्रांतल्या फुलांची सरली कथा पुराणी
भरपावसात आतां ------







माणूस जाने. १९७२
साहित्य सौरभ, आकाशवाणी मुंबई ११
११ जुलै ८३



# धो धो पाउस आला


लख लख लखती विजा चमकती,
गडगडती घनमाला
अवचित पहिला पाउस आला,
धो धो पाउस आला ---------------

रंगबिरंगी चितारलेला । ध्वज इंद्राचा उभारलेला
कोभिन्न काळ्या मेघदळाला । वरुणाचा आदेश मिळाला
कडाड् पडघम् झडे, आवरा आषाढी अश्वाला,
धो धो पाउस आला
लख लख लखती विजा-----

न्हाले डोंगर, तरुवर न्हाले । तुडुंब भरले निर्झर नाले
माळरानही नहानलेलें । माडासंगे मधुरस प्याले
दिशा दिशाही रिंगण घालीत आल्या रसभरणाला,
धो धो पाउस आला --------------
लख लख लखती विजा ----

तरुवेलींना घालुनि वेढा । पुढे निघाला उनाड ओढा
खडकापाशी हटून थोडा । म्हणतो, "मजला सत्वर सोडा
मातीला संदेश सुगीचा जातो सांगायाला,"
धो धो पाउस आला
लख लख लखती विजा ----

ग्रीष्माचे अवसान गळालें। ऊन्ह मोळते पार पळालें
सुगंध वारे गात निघालें। सळसळ पानीं रान हांसलें
चराचरांचा कणकण नाचे देउनियां करताला,
धो धो पाउस आला
लख लख लखती विजा-----
गिरिशिखरावर कुंभ घेउनी उभी श्याम जलबाला,
धो धो पाउस आला
दऱ्यादऱ्यांतुन शीळ घालते वनराणी गगनाला
धो धो पाउस आला
या रसरंगी भिजून घ्या हो जाता दूर कशाला ?
धो धो पाउस आला.







# काळी बाभळ सांगते

"ऐका शेताच्या बांधाला काळी बाभुळ सांगते,
आवं बघावं भावोजी काय रानांत चालते ?"

म्हा पोमई कुवार नवसासायासाची पोर
झाली जवान छचोर आतां आपुल्यासमोर
पानांमधून आंब्याला कशी चोरून पहाते ?
आवं बघावं भावोजी काय रानांत चालते ?

केळ लेकुरवाळीला पुन्हा लागला आठवा
हिचे डोहाळे कठीण म्हणे माहेरी पाठवा
आतां सासरचे काय हिला टोचतात कांटे
आवं बघावं भावोजी काय रानांत चालते ?

भोळसट भातशेत डोले आपुल्या तालांत
आहे कधी का कुणाच्या उगा अध्यांत मध्यांत ?
मेली कांटांची हिरवळ कांदे नाकानं सोलते
आवं बघावं भावोजी काय रानांत चालते ?

सत्रा नखऱ्याच्या नाकेल्या काल द्राक्षवेली आल्या
उसमळ्याच्या नादाला म्हणे उगाच लागल्या
उभा शेजारी पांगारा म्हणे माझे काय जाते ?
आवं बघाव भावोजी काय रानांत चालते ?

रांड पांढऱ्या पायाची उभी मुजोर कमाशी
म्हणे खाईन तुपाशी, कशी राहीन उपाशी ?
आता जांभूळनागाशी मुल्हा म्होतूर लावते
आवं बघावं भावोजी काय रानांत चालते ?

मुंजा पिंपळ, गोसावी वड जटादाढीवाला
एका गारवेलीपायीं उभा जन्म वाया गेला
खुळी मांखरांहातून रोज सांगावा धाडते
आवं बघावं भावोजी काय रानांत चालते ?
मला करायचे काय? सारे सुखांत राहोत
जरा बोला की हो कांही किती राहतां घोरत ?
माझ्या कांट्यांना तुमचे कां हो ढेकूळ हासते ?
आवं बघावं भावोजी काय रानांत चालते
एका शेताच्या बांधाला काळी बाभूळ सांगते ?

"पूर्वा"
दिवाळी ४८
कवितास्पर्धेत
द्वितीय पारितोषिक



# ये.....

जरी यायचें असेल तुजला
ये पुनवेची वसनें नेसुन:
तडितेचे करीं बांधुनि कंकण,
झंकारत किरणांचे पैंजण.
जरी यायचें असेल तुजला
ये अधरांतुन मधुघट घेऊन
आषाढांतिल वसुंधरेचा
सुगंध कायेवरती पसरुन.
आकाशाची निळी ओढणी,
नक्षत्रांची त्यांवर गुंफण
इंद्रधनूचा कंठ, भर्जरी
किंचित ढळलेले अवगुंठन

काळ्या कुरळ्या कुंतलपाशीं
धूमकेतुचा गजरा माळुन,
ये, कस्वंदी मृगनयनांतुन
श्याम घनांचे काजळ घालुन.
तुझ्या लाजऱ्या गालांवरती
काश्मिरांतले केशर फुलुं दे.
सुमकोमल तव ओठांवरती
पिकलेले डाळिंब फुटूं दे.
शिशिरामधल्या स्वप्न-पहाटे
दाट धुक्यांतुन वाटा शोधित.
मंद निळ्या शुक्राच्या सोबत
कळिकेवर दंवबिंदू उधळित
चंद्रफुलांनें ओंजळ भरुनी
येशिल माझा मंचक सजवित;
बहराचा मधुवसंत अपुल्या
धुंद मिठीतुन रंगत रंगत.

जरी यायचें असेल तुजला,
ये गरुडाचे पंख उभारुन;
कवळुन मजला घेउनि जा संग
इंद्रधनूंच्या सात थरांतुन.
चंद्रकोरिच्या हिंदोळ्यावर
झोके घेऊं अवकाशांतुन;
सात नभांच्या पल्याड लपल्या
कवितेला संग आणूं खेचून.






# मूर्ती प्रियतम व्हावें

चाहूल अंगणीं पैंजणमद रुणझुणलें,
दारांत कितकी कंकणकर किणकिणलें,
स्वर अमृत भिजलें शिरले हृदयांमधुनी,
" मी आलें घेऊन चंद्रफुलांचे झेले —"
मधुगंध उसळला, भरला अवकाशांत,
नवरंग मारवले कणकण दाही दिशांत,
मकरंद ओतला, घागर जिभलीवरती,
कुणि दूर आळवी सनईतून कामोद
त्या मधुर सुरांतुन सूर सखे मिसळावें,
अन मीलन अपुलें अलगद कोरून घ्यावें,
तूं उधाणलेल्या उन्मनलाटेवरती,
मन मोरपीस हें वाहत वाहत जावें.
तव ओठांमधुनी ओंठ विसरुनी यावें,
तू श्वसन सुगंधित माझे बनुनी वहावें,
अन रोम रोम हें तुझिया रोमांमधुनी,
कुस्करुनी . एकच मूर्ती प्रियतम व्हावें.

# युक्त्या

अचाट युक्ती तुजला ठाउक,
नकळत फुंकुन फुलवायाची;
मोरपिसांना मुठीत मिटवुन,
उगाच वाटा भुलवायाची.
दान कुणाचे गुपचुप घेउन
अंगावरती नटवायाची;
भरारतांना मध्यावरती
पंख अचानक मिटवायाची.
डबडबलेल्या दिशादिशांना
अबोल नयनीं आठवण्याची
शून्य जांभळ्या क्षितिजकडेला
मिटल्या ओठीं सांखवण्याची.
कधी गुलाबी पंख उभारुन
बसल्या ठायीं अवघडण्याची.
मला परंतु एकच ठाउक
गुंतुन पडतां तडफडण्याची.



'बळवंत' दिवाळी १९७०
'साहित्य सौरभ' आकाशवाणी केंद्र मुंबई
११ जुलै १९८३



# फुटलें धरण



जेव्हां जवळ होतीस
कधीं आलें ना कळून,
आज फुटक्या मुठीत
गेलें क्षितिज गळून.
झालें आकाश बेभान,
गेल्या दिशाही मळून,
आज जवळ येऊन
नाही पाहिलें वळून.
कसें घातलेंस घण
सारें फोडून तोडून,
कोण देईल बांधून?
उरीं फुटलें धरण.



'वीणा' जुलै १९७०



# वाट चुकलेली लाट

कशी केसात खोवून
      शुभ्र फेसांचा फुलोर,
मोती, शंख, शिंपल्यांचा
      ओटीं बांधून बिलोर;
क्षण हांसून, खेळून,
      किल्ले वाळूंत बांधून,
गेली बुरुज मोडून,
      खोल खिंडार पाडून.
वाट चुकलेली लाट
      आली खाडीत चिंचोळ्या,
गेली ठेवून शेवाळ,
      घाण, चिखल नि आळ्या
एका संथ किनाऱ्याचे
      असे बरें हसूं झालें,
भस्मचर्चिल्या नभाचे
      मुके डोळे पाणावले.

"बागलकर"
दिवाळी ८५



# दिशा फितूर झाल्या

कशा दिशा ह्या फितूर झाल्या,
कुणी जोडलें? कुठलें नातें?
आभाळाचा फक्त पुरावा
धरून बसली तुटकी बोटें.

वाळूमधलें जखमी पाउल
शेवाळाची त्यावर खपली,
येउन काळ्या खडकावरती
छिनाल लाटा हंसल्या नकली.

बेईमान त्या क्षितिजावरती
काळवंडलें. काळवंडलें.
अन साडाचे मूक हुंदके
खारट वाऱ्यावरती विरले.

'वीणा' जुलै १९७०

# माझेच दैव खोटे

स्वप्नांतही मला कां आनंद ना मिळावा?
माझेच दैव खोटे, कोणांस दोष द्यावा?
हा सूर्य तोंवरी मी थोडे हसून घेतो,
येईल रात्र जेंव्हा घेउन चंद्र, तारे,
निजवील ह्या जगाला मधुमंदगंध वारे,
वेड्या मना, तुला का तेंव्हाच जाग येते?
काळीज कांपणारी का हांक ऐकुं येते?
करिं घेउनी व्यथेचा कां फुंकितोस पांवा?
माझेच दैव खोटे, कोणांस दोष द्यावा?
गेलीस ना सखे तूं क्षितिजांचिया पल्याड,
टाकून वाळवंटीं मज एकटा उन्हात,
निर्माल्य हें सभोंती मकरंद संपलेला,
अन कालकूट पेला ओठांस लावलेला,
हें दुःख अंतरीचे, ही आग वंचनेची,
हा डोंब वेदनेच्या सांगा कसा शमावा?
माझेच दैव खोटे, कोणांस दोष द्यावा?
शिशिरांतल्या पहांटे आलीस अंगणांत,
उधळीत केशराचे नवरंग जीवनांत,
दंवबिंदु वर्षले तूं माझ्यावरी करांनी,
बहरुन चैत्र होतां माझ्याच रोमरोमीं,
झंकार पैंजणांचा आकाश भारलेलें,
सार्‍या तुझ्या खुणां त्या, दाटून कंठ यावा
माझेच दैव खोटे, कोणांस दोष द्यावा?

होतो फुलून राणी दारांत पारिजात,
गुंफून घातल्या मी माळा तुझ्या गळ्यांत,
स्पर्शीत मोर्णिमेच्या वर्षाव अमृताचा,
मकरंद चुंबिण्याचा रंगांत रंगण्याचा,
तो धुंद काळ गेला वाऱ्यावरी उडोनी,
जखमा अजून जपतो वेडाच मी म्हणावा
माझेच दैव खोटे, कोणास दोष द्यावा?
डोळे मिटून राणी, तव रूप आठवावें,
अन आसवांत माझ्या संपूर्ण तूं भिजावें,
गगनांत मूक आतां आषाढ दाटलेला,
क्षितिजावरी किनारा बघ पार फाटलेला,
मंजूर प्रीत अमुची नव्हती जगास राणी,
ओठांत हो विराणी शब्दांस पूर यावा-
माझेच दैव खोटे, कोणास दोष द्यावा?
बोलावुनी मला तूं घेशील ना कुशीत?
चिरशांतता सुखाची देशील ना उशीत
ह्या बेगडी जगाच्या आतां नसे निवारा,
येथे असत्य पिसे सत्यास बंद कारा,
मी आवरून सारा ठेवीयला पसारा,
चिरमीलनांत राणी मज लाभू दे विसावा,
माझेच दैव खोटे कोणास दोष द्यावा?

तरुणभारत नागपूर दिवाळी १९६९

# समुद्राचा तोल गेला तेंव्हा


समुद्राचा तोल गेला तेंव्हा ——————
तरणे माड खसखसत होते, कुजबुजत होते;

केसाळ हातांनी बगला खाजवीत होते,
निर्बुध्द खडकांच्या कानीं सात खडे,
हा हा हसत चक्क अंगावरुन गेली
एक विसविशीत वावटळ;
—————— समुद्राचा तोल गेला तेंव्हा,

बुझदिल सुळके उभे होते माना उंचावून
झिळमिळती गाणीं गात जाणाऱ्या
नवथर गोऱ्या मोरींच्या वाटेवर,

पोरसवदा क्षितिजाचे
हळवे आकाश सांभाळणारे बिनबोटांचे तळवे
नुसतेच थरथरत होते.
—————— समुद्राचा तोल गेला तेंव्हा,

तेंव्हा त्याचे लांबलेले हात ओढून
कुरवाळत होता,
काळे मुंडासेवाला, मिणमिणत्या डोळ्यांचा
एक वृध्द किनारा ——————



'साहित्य सौरभ' आकाशवाणी मुंबई जून ७२


# मी + तूं

मी + तूं = लाटांशी कुजबुजणारी साज,
मी − तूं = आषाढाची वादळलेली रात,
मी × तूं = पौर्णिमेच्या मिठीतले आभाळ,
मी ÷ तूं = भोवळ येऊन कोसळणारी उल्का,
मग सोडव पाहूं —

$$\text{हात} + \text{हात} - \sqrt{\text{आसमंत} \times \text{श्वास}^{२} + \text{ओठ}^{४}} - \frac{१}{\text{तुझ्या माझ्या अस्तित्वाची जाण}} \times \text{खूप (म्हणजे...... आणखी खूप पुढें क्षितिजापर्यंत)}^{१०} = \text{एक स्वप्न}$$

# मी तुला पाहिलें आहे

पराभवांनी काळोखाची निशाणें नाचवीत
पिसाट निदर्शनें केलीत,
घेराव घालून दगडफेक केली.
बरेंच झालें, मधली कांच दुभंगली.
ओंजळभर अंजिरी पिसें पोपटी वाऱ्यावर भिरकावुन
तडकलेल्या कळसावर केशरी पदराचे ध्वज फडकावतांना
मी तुला पाहिलें आहे.
कुळू खोऱ्यांतील बर्फगार शिखरावरुन धांवतांना
हारपळलेली हेमंत–फुलें हुंगाव्याचे वय अजून गेलें नाही,
शिशिरांत पहाटलेलें शुक्र चोरण्याचे भय कुणी दिलें नाही.
आस कलता करुन भिंगरीवाणी भिरभिरतांना
मी तुला पाहिले आहे.
हंसलीस, डसलीस, रुसलीस......
अर्ध्या उंचीवरच एक पंख मोडवलास,
एक पंख मिटवलास,
एक पंख पेटवलास,
चोचभर चंदनतुकडा चघळीत
मखमल धुक्यांत पेटत्या पंखाखाली भरारतांना
मी तुला पाहिलें आहे.
खडकावर लाटा थडाडतांना सुध्दा एक शिंपला शाबूत होता.
डोलकाठीवरचे कावळे कधीचेंच कळवळून कलकलत होते.
कुबड्या ठकठकत ओडक्या शिखरावर,
ठणकणारे पाय ठणकावून वाट नाकारतांना,
समोर तुझ्या महानगरांतले दिवे विझलेले.
पण— — — — — — — — — — —
स्वागताच्या समया अंगभर सजवतांना
मी तुला पाहिलें आहे.



शब्दांगण जुलै ८६



# वेणा

जरा ओचें उचलून
बघ तुझ्या पायखुणां,
तुला कळतील माझ्या
गंध- वादळाच्या वेणा.

वेड्या पिशा आभाळाला
आषाढाची हांक येतें,
पापण्यांच्या ओंजळीत
अशी बरसात होतें.

काजळाच्या दीठीतून
बिजलीचा लपंडाव,
धार धार भिजतांना
ओठीं येतें तुझें नांव.

डोंगराच्या कपारीत
वारा जेव्हां भोवंडतो
मोरपीस पांघरून
तुला उंच झोके देतो.



'अश्वमेध' १९७१

साहित्य सौरभ आकाश.— केन्द्र मुंबई

११ जुलै १९८३

# कोण तूं?

कुठेही रहा दिग्गजांच्या पल्याड,
तुला सूर्यभिंगातुनी शोधिन;
धरेची गती वाढवोनी जराशी
तुझी तारका खेचुनी घेइन.

तुला धावणे फक्त माझ्यासभोती
सहस्रावधी जन्म जन्मांतरी;
तुझा वेग, कक्षा दिली मोजुनी मी,
अधिष्ठान माझ्या इशाऱ्यावरी.

तुझ्या राग, लोभाचिया वादळांची
जसे यापुढे अंबराला क्षिती,
जल्याला तुझ्या येउं दे पूर मोठे
महासागराला कुणाची भिती?

तुझी पौर्णिमा, अष्टमी वा चतुर्थी
अमावास्य अस्तोदयाची घडी;
तुझे बाल्य, कौमार्य, तारुण्य तैसें
जरा, जन्म, मृत्यू मला माहिती.

तुझे श्वास, निःश्वास, अश्रू, उसासे,
तुझी नित्य नाविन्य शेजारती;
तुझ्या हास्य-लास्यावरी हक्क माझा
तुझे धुंद लावण्य, व्यंगाकृती.

तुझा चैत्र, आषाढ, कार्तीक माझा;
तुझी सावली ऊन्ह बारा ऋतू;
तुझे भोग भोगावया एकटा मी,
तुवां ओळखावें जरा, कोण तूं?

शब्दांगण दिवाळी ८५।

# अमर्याद रंगामध्ये नाहतो...

अशा आर्त आकाश भेदून हाका
कळो ना कळो मी तुला वाहतो;
कुणां सत्य वाटो न वाटो परंतु
अमर्याद रंगामध्ये नाहतो.
दंवातून सर्दावलेल्या निळाई-
तुनी येउनी मी तुला पाहतो;
अनामीक एका दिशेच्या कडेने
तुझ्या पावलांच्या खुणां वेचतो.
स्वरांच्या पुढे आठवा सूर ज्याचा
असा शब्द ओठांत घोटाळतो;
दुभंगून दंडांतल्या लोहबेड्या
जुने पर्वताचे कडे शोधतो.
उसासून येतो दिशांतून वारा
पिसारा पुन्हा तोडुनी फेकतो;
असा उष्णतेवीण अंगार ज्याच्या
धगीतून ओल्या कळ्या मांडतो.
तुझे हात हातांत घेऊनी गातें
पिशी रात्र काळ्या नभी हिंडते;
खुळ्या तारकांना कशी आकळावी
सुक्या मेघखंडातली भासिते?
असें रोज आतां किती वादळावें?
किती उन्मळावें मुळांपासुनी
किती उंच जावें? किती कोसळावें
तुवां घेतल्या मापण्या कांपुनी.



किर्लोस्कर मार्च १९७१ 'साहित्य सौरभ' आकाशवाणी मुंबई



# कुणी येणार म्हणून



किती भयानक होतें ?
सारे थांबलें वादळ;
आज संपला पाऊस
गेली विरून ढगाळ.

झालें नितळ आकाश
गेला आषाढ-श्रावण;
भाद्रपद संपे, आतां—
मार्गशीर्षातले ऊन्ह.

मार्गशीर्षातले ऊन्ह
मऊ पिवळें पिवळें
नुकत्या न्हालेल्या राणीचे
तळहातांचे कोंवळें.

मागे चैत्रांत बांधले
होतें दारात तोरण,
पानें झाडीं ओलसर
कुणी येणार म्हणून.

'वीणा' जुलै १९७०

# जांभळं पीस

मधलें दार किलकिलें करून किलबिलत होतीस,
तेव्हांच मी उशाखालची पिसें नीट मोजून ठेवलीत.
"अरेरे ! पौर्णिमेचे चंद्रदेखील चोरीला जातात—"
एका परिव्राजक नक्षत्राचे अखेरचे शब्द ऐकुनसुद्धा
तुला रेशमाचे रंगीत तुकडे धडपणें धरतां येत नाहीत.
जिथें फुलपाखरांना कुणी आपले म्हटलें नाही
त्या वनांतील उर्मट तंण परत आणूं नकोस.
कमळपानांवरचे धांदरट दंवाचे थेंब अजून कोसळले नाहीत
अशा तळ्यांत तुझे वेंधळे पंख धुवून येशील
तर उशाखालचे एक जांभळेपीस मी तुला देईन.



# तुझं येणं जाणं

तुझं येणं जाणं
एका आभाळाचं लेणं
कशी वादळाची खूण
पटवावी ?

तुझं देणं घेणं
एका पावसाचं गाणं
आतां पृथ्वीचं न्हाणं
सत्रंदीन.

साहित्य सौरभ
आकाशवाणी मुंबई
जून १९७२



# बिलोरातून

बिलोरांतून रंगाचे लोट उधळत
जावा एक किरण,
अगदी तस्साच ————
मी तुझ्या बुबुळांतुन
धांवतो आहे ---------
भरधांव ————
अबलख अश्वाच्या पाठीवर
तुझ्या किनरवाणी श्वासांचे
खोगीर — जरा उसवलेले ——
ढगांना न कुरवाळतां·
कुठे पठारातुन सरळ पुढे आलो
पण,
पूर ओसरेस्तोवर,
लगाम खेचून थांबायलाच हे



"अनुष्टुभ"
फेब्रुवारि ८५




चंद्र नभीं डुलें
चांदण्यांची फुलें
माझे मन उले ऽ तुझ्यासाठी.
पावलांचा भास
येतो गंधश्वास
पडे गळफांस ऽ रेशमाचा.
घुंगुरांचा नाद
येतां दिली साद
तुझी पडसाद ऽ यावी आतां.
शरदाची रात,
झुरे पारिजात
देशिल ना हात ऽ माझ्याहातीं?
लटेवरी फेंस
गालीं हसतेंस
कां ग छळतेस ऽ क्षणोक्षणीं?
आणिलीस जाग
म्हणालीस माग
पेटलीसे आग ऽ जीवघेणी
जीव तळमळे
दिनरात जळे
हासतात खुळे ऽ भोंवताली
ओठांवरी गीत
तुझी माझी प्रीत
होईल का धीट ऽ चांदण्यांत?



# चैत्र होता तोंवरी

चंदनाच्या काटक्यांनी बांधिलें घरटें तिला
चैत्र होतां तोंवरी ती गात होती कोकिळा
आम्रशाखा धुंदलेल्या कोंवळ्या पर्णांतुनी
गंधवेड्या मंजिरीला जाग ये स्वप्नांतुनी
मीलनाचे सूर आळपीत आली प्रेमला
चैत्र होतां तोंवरी -----
किसलयांच्या स्पंदनांना स्पर्शणारे चांदणे
वेदनेला शोधणारे अर्थवाही गोंदणे
अंबराला वेढणारा शब्द होतां भेटला
चैत्र होतां तोंवरी ----
आज ते घरटें रिकामे वाळल्या फांद
मंजिरीचा श्वास आहे थांबला बुंध्यावरी
सूर पाचोळ्यांत शोधी आम्रवेडा टाकला
चैत्र होतां तोंवरी ----

सजीव जून १९८७
'साहित्य सौरभ' आकाशवाणी के.
मुंबई
११ जुलै १९८३



# जनरीत ह्या जगाची

जनरीत ह्या ज़गाची नाही कधीच शिकलें
माझा तुला म्हणालें, चुकलें खरेंच चुकलें.

साधेंच बोलणे अन हंसणे कुठे जरासें
गाळांतुनी गळ्याशी रुतलें अजून रुतलें.

जाळे विणीत होते धागे तुझे नि माझे
कोषांत रेशमाच्या गुंतून हाय फसलें.


आडून चोरुनी मी केले छपून वार
मण डावपेंच गनिमी हुकलें पुरेंच हुकलें.

तू सागरासमान, तळ खोल आकळेना
वेचावयास मोती कांठांवरुन झुकलें.



ह्या कांच रोविलेल्या भिंती कशा उलंघू
हें टोंकदार भाले खुपसून पाय फुटलें.

शब्दांगण जुलै ८५



# ललाटलेख

लिहिलें असें कसें ग अपुले ललाटलेख?
सांगू नको कुणाला, म्हणतील काय लोक?
मरजून वेत हांतीं, दाबून दांत ओठीं
ह्यांचे सवाल कोटी, माझा जवाब एक.

बदनाम मी कधीचा चौकांत बांधलेला
जेष्ठांतल्या दुपारी फुलला तुझा अशोक.
निभवून घे जरासें थोडीच राहिलेली
स्वप्नांपल्याड गेली वर्षे मुकी अनेक.

पाहून पाहिल्याचे तूं भासवूं नकोस
नजरेत ओळखीची करशील धूळफेक.
आलें जरी भरोनी घे थोपवून पाणी
माहोनियां सभोंती घे पांघरून वेड.

गगनांत गोंदलेली, शब्दांत कोरलेली
मी दाखवूं कशाला प्रतिमा तुझी सुरेख?

शब्दांगण से ८५



# गंध कसा विसरावा ?

सुखस्वप्नांच्या प्राजक्ताचा गंध कसा विसरावा ?
तुझ्या नि माझ्या मधुमिलनाचा छंद कसा विसरावा ?
तुला दिले ते सर्वस्वाचे दान कसें विसरावे ?
भवितव्याच्या सुख-चित्रांचे रंग कसें मिटवावे ?
आकाशाच्या करपाशांतुन धरतीने निसटावे—
सांग कसें सरितेने सागर सोडोनी परतावे ?
सांग कसा ह्या हृदयांमधला विरहानल विझवावा ?
तुझ्या नि माझ्या-----
स्वातीच्या थेंबाने कैसें शिंपावरति रुसावे ?
भरतीच्या लाटांनी कैसें चंद्राला हिणवावे ?
मकरंदास्तव आसुसलेल्या भ्रमरांनी परतावे
श्याम ढगांना सोडुन कैसें चपलेने चमकावे ?
पिचलेल्या ह्या पाव्यांमधुनी सूर कसा उमटावा ?
तुझ्या नि माझ्या-----



# अपूरे स्वप्न



सुखें झोपला एक बिजांकुर
स्वप्न रेखली स्मृतिपटलांवर,
"कवच फोडुनी पिंपळ होइन
उंच, भव्य सी जगेन जीवन—
रसरसलेलें भोगिन यौवन
सवें वल्लरी, कलिका घेउन
पर्णपंक्तिची छाया वितरित
भ्रमर, स्वर्गांचे निरोप ऐकत
असाच एके दिवशी लोपिन
आयुष्याचे वेचित कणकण"—
स्वप्नसागरीं होता डुंबत,
काळ तत्क्षणीं आला धांवत.
हाय ! चिमणीने त्यास भक्षिलें
स्वप्न अपूरें हवेंत विरलें,



# आयुष्य

आयुष्य; मोडलेल्या खांबावरी मनोरा,
रंगीत दालनांना पुसतात अश्रुधारा.

गगनांत दूर तारा फुलवोनियां पिसारा,
निर्जीव सामर्थ्यांच्या डोळ्यांपुढे सहारा.

गुलमोहरांस कैसे फुलतात फक्त काटे?
कुरवाळलो तरीही सर्दावल्या पहाटे.

हिणवील क्रूर लाटा; हंसतो उधाणवारा,
झिजतो कणांकणांने येथे मुका किनारा.

आकांत कोकिळांचा कळतो कधी कुणाला?
क्षण गंध मंजिरीचा, आला वसंत गेला.

हळुवार भावनांचा दिनरात कोंडमारा,
विश्वास ना तरी ह्या निश्वासितां विनाशा.


—सन्मित्र दिवाळी ८६

# मृत्युरे

कोसळो आकाश आतां काय माझे राहिलें?
हक्क होता ज्यावरी सर्वस्व सारे नासलें.
पौर्णिमेचे चांदणे तें स्पर्शतांना पोळतो,
श्रावणाच्या थंड धारा वर्षतांना दाह होतो
धांवतो आवर्त भोंती; शीड आतां फाटलें,
दूर राहिला किनारा तारूं माझे मोडलें,
मी कसा गांठीन तीरा? ही व्यथा जळते उरीं;
वा नको ती व्यर्थ आशा, मोडक्या माडापरी.
कोंदला अंधार सारा धुंदल्या दाही दिशा,
व्यर्थ मी स्वप्नांत होतो, रंगली होती उषा,
घेउनी प्रीतीरसाच्या कावडी स्वांद्यावरी,
मी तुम्हां शोधीत आलो सांवळ्या मेघापरीं.
फक्त द्यायचेंच होते मी न कांही याचिलें,
कां तुम्ही फोडून माझे कुंभही लाथाडिलें?
भग्नआशा, भग्न प्रीती, भग्न स्वप्नें जाहली,
तापला वैशाख वरती, वाळवंटे तापली.
सावली दिसते न कोठें, एकटा मी चाललो—
अस्थिमज्जापंजराने, मी न माझा राहिलो.
चुळभर प्रेमासही का जाहलो मी पारखा?
उंबऱ्याला लाविलेल्या रुंद खडकासारखा.
व्यर्थ तुम्ही सागरांनो, गर्जना केवळ वृथा,
घेउनी तुमच्या किनारी शिंपला माझा रिता,

कां असा आषाढमेघा जाहलासे बेगडी ?
नाहेत धरती परन्तु चोंच माझी कोरडी
ये नभा आलिंगनी ये, घे व्यथा मम जाणुनी,
स्नेहशब्दा बोल एकच, मौन अपुले सोडुनी.
ज्या वसंताला कळावी कोकिळाची वेदना,
तोच गेला दूर निघुनी, जाळते ही वंचना.
आसवांवाचून रडणें, हृदय आतां जाळणें,
दाटुनी कंठात येणें आणि खोटे हासणें.
नाईलाजानेच आतां श्वास घेणें, बोलणें,
सोसणें आघात सारे आणि अंती थांबणें
याचसाठी ना दिला तूं जन्म आई, होय ना.
दुष्ट तूं, टाकून मजला पोरका गेलीस ना.
भंगले तें स्वप्न सारे रंगलेले रेशमी,
मृत्यु ये, पसरुन बाहू स्वागताला सिध्द मी.

# फत्तर



ज्या शीलेतुन तुला घडविलें
त्याच शिलेचा मीही फत्तर,
ह्याच जन्मीचें नातें अपुले
कसें मिटावें मधलें अंतर?

चरणीं तुझ्या जो घेतो लोळण
निजजन्माचे सार्थक समजुन,
तोच मला रे पदी तुडवितो
वाटेवरला फत्तर हिणवुन.

दहि, दुध, मध शर्करेत न्हाशिल,
कंठी तुळसीमाळ सुशोभित,
पुष्प, धुप, दीप, गंध, अर्गजा ,
नैवेद्या मिष्ठान्नें सारित.

विश्वनाथ तू मंदिरवासी,
जगां लागले वेड तुझ्यास्तव.
सुमशय्या तुज, मायदळी मी
पिशापरी अन करितो आर्जव.

चिखलपुटें बिछा कायेवर,
धुलिकणांचे मजला भूषण,
स्तुती आरती तुज आळविती
शिव्या शापती मज ओलांडुन.

कुशीत एका जन्म आपुला
परि दैवाचे उलटे अक्षर;
ज्या शिलेतुन तुला घडविलें
त्याच शिलेचा मीही फत्तर.


'विवेक' दिवाळी १९६९ 'साहित्य सौरभ' आकाशवाणी मुंबई ११ जुलै १९८३

# रात्र म्हणाली अंधाराला


क्षितिजाच्या सीमेवर सविता
सध्येसाठी अडला होता;
वस्त्र तिचे पण गुंतुन होते,
लाटांमधुनी कुरळ्या आणिक-----धवल घनांतुन.
अशाच एका कातरवेळी,
माडांच्या झापांतुन येतां,
शिरिं किरणांचा घट हिंदळतां,
सावरिला अन्-----
रात्र म्हणाली अंधाराला,
"पाठलाग कां करिशी माझा
सांग तुझा रे कसला हेतू?"
अवखळ अंधाराने म्हटलें,
जरा थांब ना. करूं ये नर्तन;
निळ्या नभाचे विशाल अंगण,
धुंद होउ ये अमृत-प्राशुन, दोघे आपण."
रात्र दचकली,
अंधाराचे ओठ ओलसर
बघत राहिली.
सोडविला कर हिसडा देउन,
किरणांचा घट डोईवरचा
हळूच उतरे सागरकांठीं,
लाजत लाजत, किंचित भयभित,
किंचित हसली.
अंधाराने पुन्हा एकदा
धीर बांधिला.
खांद्यावरती ठेवियला कर,
आणि उचलली तिची हनुवटी,

-------मिटल्या ओठीं गीत उमटले
शब्दांवाचुन,
गजऱ्यामधल्या मुग्ध कळ्यांना
श्वास तयाचा गेला स्पर्शुन,
"तूंच म्हणाली होतीस मजला,
शरदामधल्या त्या पुनवेला-----स्वर्गंगेच्या फेसतटावर."
अंधाराच्या छातीवरती
-----हास्य वर्षले.
होकाराच्या प्राजक्ताची
रास वर्षली.-----
"जरा ऐक ना,
कां असा होतोस बावरा?"
अंधाराची थाप कडकडे
चंद्राच्या त्या रुंद डफावर,
सागरलाटा कर उंचावुन
हसल्या खदखद,
रातराणिच्या----मधकणांतुन
चार पाडलें सरली अलगद,
नुपुरांचा झंकार-----
परंतु उठला नव्हता,
हिरमुसलेली रात्र म्हणाली,
-----------ओचें उचलुन
"त्याच अंगणीं गळले मैंजण
करतां नर्तन, श्रावणांतल्या धारांसोबत."
अंधाराच्या करीं गुंफुनी हात आपुले,
रात्र निघालीं शोधित मैंजण,
रात्र म्हणाली अंधाराला, बोट उंचवुन
तें बघ गळलें माझे मैंजण,
विस्करुन पडलें सारे घुंगुर—"
मिळुन दोघे वेचुं लागली
चमचमणारे, लुकलुकणारे, घुंगुर सारे.
सळसळ वळली

कुशीत टका पिंपळपानें
शेंड्यावर धारेचा पिळें
दचकुन उठली.
रातकिड्यांनी बदलुन अपुला
सूर लावला.
अंधाराने उगाच म्हटलें
"अजुन वेचायाचे उरलें ------बरेंच घुंगुर"
आणि अचानक
त्या दोघांची धडपड पाहुन
निळ्या धुक्याचा पडदा सारुन
पूर्वा हंसली,
आणि तिच्या गोऱ्या हातांतील
किणकिणले सोन्याचे बिल्वर,
बावरल्यागत उठली दोघे
लगबग लगबग
त्या घाईतच पुन्हा सांडले
सारे घुंगुर निळ्या अंगणी
आणि दवाची
रात्रीच्या डोळ्यांतुन गळली
दोन आसवें
गवतांवरती ----------
★★★★★★★★★



'युगवाणी' ना॰ पूर जुलै ६६



# प्रियतम दर्शन

ही रम्य पहाटेची किरणें स्पर्शिती मजला मृदुल करें
प्रीतफुलें उधळून दिली तूं पुलकित सारें जीवन रे

पूर्व दिशेच्या मंचावर तव कुंकुमचर्चित पदयुगुळें
दाट धुक्याच्या पडद्याआडुन केशर शिंपिती करकमळें
ह्या किलबिलत्या पक्ष्यांच्या ओठीं हांक तुझी ये मधुर स्वरें
प्रीतफुलें उधळून दिली तूं---

गिरिकुहरांच्या अंगांगावर, हरिततृणाच्या चौरंगावर,
आरस्पानी नदीतटावर, रानफुलांच्या रंगपटावर,
हा शीतळवारा, झुळझुळणारा परिमळमय तव श्वास फिरे
प्रीतफुलें उधळून दिली तूं---

पोपटलेले केळीचे बन, तांबुस अंकुर हळवे स्पंदन,
दवबिंदूंची स्नेहल पखरण, अज्ञाताचे प्रियतमदर्शन,
हें हृदयाच्या कोषांतुन अलगद मंगलमय संगीत स्फुरे
प्रीतफुले उधळून दिली तूं---



'वसंत' जुलै ८३

# वारी वारी विपदांवारी



वारी वारी विपदांवारी, बन्सीधर बनवारी
रे तुला शरण गिरिधारी
वणवण फिरलें, वनीं भटकले
मान किती अपमानही गिळले
नश्वर सारा व्यर्थ पसारा मांडियला संसारी
रे तुला शरण गिरिधारी
वैशाखाचा वणवा भंवती
वाट तापली कांटे रुपती
श्याम घना तव शीतल छाया असु दे रेन दुपारी
रे तुला शरण गिरिधारी
अद्वितीय, अप्रमेय, अव्यय,
अमृतमय, अगमागम, चिन्मय,
अणुरेणूंचा, स्थलकालाच्या तूंच खरा अधिकारी
रे तुला शरण गिरिधारी
वजा, बेरजा, हिशेब करुनी
सुखदु:खाचा शेष नाशुनी
गतजन्माच्या कर्मफळांची चुकवी आज उधारी
रे तुला शरण गिरिधारी
नको कुणाचे सुमधुर भाषण
सप्त सुरांचे गायन, वादन
अनुहत्तवेणूनादीं भुलली राधा आज मुरारी
रे तुला शरण गिरिधारी
जडदेहाचे तोडुनि बंधन
विकारवसनें येतें फेडुन
अवघे मीपण तुजला अर्पण घेशिल ना ॐकारी
रे तुला शरण गिरिधारी
व्याकुळतें, तुज किती विनवितें
समचरणावर लोळण घेतें
तारि तारी रे कंसारी चक्रसुदर्शनधारी
रे तुला शरण गिरिधारी

"मंगळगीत" आकाशवाणी मुंबई, संगीत- शांकनील गायिका - अपर्णा मयेकर

# यमुनेकांठी

मोरमुकुट शिरीं कटी पितांबर,
यमुनेकांठी आला गिरिधर
रानफुलांच्या घालुनि माळा,
धेनू वळवी श्याम सांवळा,
घुमवित पांवा मंजु मधुर सूर,
यमुनेकांठी आला गिरिधर ----

वृक्षलतांवर तांबुस किरणें
हिरव्या कुरणी पळती हरिणें
जरा थांबली पाणवठ्यावर
यमुनेकांठी आला गिरिधर ----

जमले सारे गोप गोपिका,
अजुनी नाही दिसे राधिका,
आतुर डोळे फिरती भिरभिर
यमुनेकांठी आला गिरिधर ----



ज्ञानदुत दिवाळी १९८२



# सोनुल्यास

लक्ष नक्षत्रांचे तेज सोनुल्याच्या नयनांत,
पौर्णिमेची रात माझ्या अंतरिच्या आकाशांत

चाफेकळी नासिकेत वाहतात गंधश्वास,
बागेतला वारा बाई घेई त्याचा अभिलाष.

गुलाबाचे लालपण टपोरल्या गालीं हंसे.
हालतात पाळण्यांत हातपाय इवलेसे.

कुठें कुठें काळे तीळ अंगावरी शोभतात,
सोनुल्याच्या रुंद भाळीं विधीलेख रेखतात.

कां रे हांसतोस चंद्रा ? नको करूं अभिमान,
महा माझ्या सोनुल्याचे मुख गोरे गोरे पान

हळू द्यावा एक पापा, गोड जणूं सुधामृत,
सोनुल्यानं सांठवीलं ओठांच्या पाकळ्यात.

हृदयांत ठेवियलें ओवाळुनी पंचप्राण
घालुनियां सोनुल्याला वात्सल्याचे पांघरुण,

माहेर
मे १९६८

# वळत वळत गाडी कशी डोंगरात आली

संगीत आणि गायिका सौ. वर्षा आंबेकर

"बालदरबार" मुंबई आकाशवाणी डिसें. ८३

वळत वळत गाडी कशी डोंगरांत आली,
वाट पुन्हा घाटांतुन दिसेनाशी झाली.
उजवीला उंच उभे निळे निळे कडे
खोल खोल अंधारी दरी डावीकडे
बघताना जीव कसा होतो वरखाली
वाट पुन्हा घाटांतुन दिसेनाशी झाली.
शेताचे सोनेरी रंग नवे नवे
भिरभिरती भातांवर पाखरांचे थवे
किरकिरत्या रानाचा वेढा भंवताली
वाट पुन्हा घाटांतुन दिसेनाशी झाली.
कपारीत झुरझुरती कापराचे झरे
मोत्यांचे विस्कटले कुणी हारतुरे ?
वनराणी वेचाया धांवुनियां आली
वाट पुन्हा घाटांतुन दिसेनाशी झाली.
भुरे, लाल, धुरकटले, निळे, जांभळे
शिखराच्या थांब्यावर मेघ थांबले
गाडी का वाऱ्याची त्यास ना मिळाली ?
वाट पुन्हा घाटांतुन दिसेनाशी झाली.
ढण् ढऽण ढण् ढऽण् अंधार धुप्प
ढण् ढऽण ढण् ढऽण सारे चिडी चुप्प
ऊण् ढण बोलायची बोगद्याची पाळी
वाट पुन्हा घाटांतुन दिसेनाशी झाली



# मानवतेच्या धर्मदीपका



स्वामी विवेकानंद नरेंद्रा शरण तुझ्या पायीं
मानवतेच्या धर्मदीपका उजळ दिशा दाही.

पद्मासन घालून बैसली ध्यानमग्न मूर्ती
मूर्तिमंत आनंद निरामय स्थिरमुद्रेवरती
चराचराच्या कल्याणाचे नित चिंतन हृदयीं
मानवतेच्या धर्मदीपका उजळ दिशा दाही.

माता ममतामयी शारदा सतत सुधा बरसे
रामकृष्ण ज्ञानामृत देती परमहंस स्पर्शे
महाकालिका तव आभ्यंतर व्यापुनियां राही
मानवतेच्या धर्मदीपका उजळ दिशा दाही.

शून्यतत्वगूढार्थ उकलितां धर्मसभेमधुनी
विद्वज्जन पंडीत थबकले, बृहस्पती बघुनी
सप्तसागरीं गर्जत गेली संस्कृतिची ग्वाही
मानवतेच्या धर्मदीपका उजळ दिशा दाही.

दीन, अनाथ, अपंग, निरक्षर करुणेच्या पोटी
रामकृष्ण तूं मिशन निर्मिलें उध्दारासाठी
प्रेमभक्तिच्या वाटा विरल्या मोक्षाचे ठायीं
मानवतेच्या धर्मदीपका उजळ दिशा दाही.

भारतपुत्रा, ज्ञानसमुद्रा, विक्रम तूं वीरा
नित्यतरुण तूं, शक्तिकिरण तूं, रविलोचन धीरा
हें चिरस्मरणा, विश्वभूषणा, तुळणा तुज नाही
मानवतेच्या धर्मदीपका उजळ दीशा दाही.



# भारतप्रियदर्शिनी

शांतिदेवता, तूं कल्याणी, दुर्गा समरांगणीं
वंदन तुज शतवार इंदिरे भारतप्रियदर्शिनी.

भिरभिरत्या पक्षांच्या ओठीं तुझा शांतिसंदेश
तिन्ही त्रिकाळी गातिल सारे देश तसें परदेश
नवनिर्माणीं रक्त सांडतां हळहळली धरणी
वंदन तुज शतवार इंदिरे भारतप्रियदर्शिनी.

मानवतेस्तव जीवन क्षणकण वेचुनि कल्याणी
दारिद्र्यासुर दहन कराया रमलिस किरणीं
कलासक्त तूं, नीतिनिपुण तूं विश्वराजकारणीं
वंदन तुज शतवार इंदिरे भारतप्रियदर्शिनी.

तूं नच अबला, शक्तिदला तूं, परचक्रामर्दिनी
रिपुदलनिर्दाळिलेस जेंव्हा कोटि शस्त्रधारुनी
इतिहासाच्या स्वर्णपटावर अमर तुझी करणी
वंदन तुज शतवार इंदिरे भारतप्रियदर्शिनी.

"बागलकर" जोने ८५ (JETA SOVENIER 85)

# आक्रमकांनो

आक्रमकांनो, पुढे याल तर सज्ज अम्ही बळवंत,
हिमालयाचे रक्षण करतो सह्यकडा यशवंत,

रक्ताच्या शब्दांनी लिहिली इतिहासाची पानें,
विजयश्री खेचून आणिली आम्ही भीमबलानें,
मातृभुमीच्या स्वातंत्र्यास्तव मरणें वा जिंकणें,
जन्म सार्थकी लागुन होते देहाचे सोनें,
परचक्राची भारतमाते कां करिशी खंत ?
हिमालयाचे रक्षण करितो सह्यकडा यशवंत.

प्रताप राणा, ताना, शिवबा अन झांशीवाली,
विसरलांत का मुंडकीं उडवित रक्तानें न्हाली ?
अजून त्यांचे रक्त नाचतें नसानसांमधुनी,
अजून त्यांच्या तरवारीचे ना सुकलें पाणी,
आज रणांवर युद्ध खेळतो भैरव मूर्तिमंत,
हिमालयाचे रक्षण करितो सह्यकडा यशवंत.

चाळण ह्या देहाची होवो बंदुकिच्या फैरीत,
भस्मभूत हें मस्तक होवो तोफांच्या आगीत,
व्यर्थ वर्षता बॉम्ब, आमुचा अभंग आवेश,
शिकंदराने अखेर म्हटलें, अजिंक्य हा देश.

आईच्या अंकावर अजुनी अगणित सिंहजिवंत
हिमालयाचे रक्षण करितो सह्यकडा यशवंत

श्वास चालला आहे तोंवर तसूंतसूंवरती,
निशाण अमुचे फडकत राहिल ह्या मातीवरती,
शेवटच्या थेंबातुन अमुच्या उठतिल शतवीर,
सहस्रवर्षे युध्द चालू द्या, नच सोडू धीर,
तळहाती शिर घेऊन लढणें हा अमुचा छंद,
हिमालयाचे रक्षण करतो सह्यकडा यशवंत.

सेनापतीने शिंग फुंकिले दौडत या सारे,
भिमथडींच्या तट्टांवरती मर्दांनो या रे,
हर हर बोला दिशादिशांतुन दुमदुमवा नारे,
भुजाभुजांतुन वीरश्रीचे संचरुं द्या वारे,
अम्हीच अमुचे भाग्यविधाते त्रिकालकीर्तीवंत,
हिमालयाचे रक्षण करतो सह्यकडा यशवंत.



'वसंत' मार्च १९७२

# मानव तितुका एक

हवी कशाला धर्मभिन्नता जातीपंथ अनेक ?
मानव तितुका एक असें हा मानव तितुका एक.
हिंदू, मुस्लिम, शीख, ईसाई, ब्राम्हण वा शूद्र,
पाश्चिमात्य, पौर्वात्य, मराठी, बंगाली, मद्र,
विभिन्न भाषा, वर्ण, देश वा प्रांत – तालुक्यांत
कुणी अम्हाला दुभंगलेले तुकड्या - तुकड्यांत ?
भिंती बांधुन समभावाचे कोरियेले अलेख,
मानव तितुका एक असे हा मानव तितुका एक.

कुणी म्हणावें आम्ही करतो विश्वाचा उध्दार,
आम्हांवांचुन दुसरा नाही राष्ट्राला आधार,
आम्ही सोडुन सारे करती धर्माचा अविचार.
सुखसमृध्दी अम्हीच आणू करुनी हिंसाचार.
कां भोळ्या डोळ्यांत धुळीची करतां फेकाफेक ?
मानव तितुका एक असे हा मानव तितुका एक.

गर्द निळी आभाळ सावली चराचरासाठी
हिरवी माया ममता दाटे धरतीच्या पोटीं,
लाडिक लाटा लळा लाविणी झुळझुळता वारा,
मारे सान्यांना बळवंतांची अधिकारी कारा,
इतिहासांतुन शोषक, शोषित युध्दांचा अतिरेक.
मानव तितुका एक असे हा मानव तितुका एक.

कितीक अमुली दुःखें दडवुन अंतर्मुख झाले,
स्वप्न सुखाचे जीवनभर त्यां चकवुनियां गेले.
अधरीं हंसरी फुलें परंतू पापण्यांत पाणी
त्या पाण्याला हळूंच टिपावें अलगद हातांनी.
मानवता धर्मात सनातन हाच खरा अभिलेख,
मानव तितुका एक असे हा मानव तितुका एक..

अन्नवस्त्र आणीक निवाऱ्यासाठी दिनरात
आपण सारे किती धांवतो उन्हांपावसांत,
परस्परांचे दुखरें माउल फुंकून देऊं या,
मर्गळलेल्या चित्तकळ्यांना क्षणभर उमलवुं या.
माणुसकीच्या गहींवराने करूं या का अभिषेक?
मानव तितुका एक असे हा मानव तितुका एक.




# श्रमवीरांनो

इतिहासाला अम्ही घडविले ओतुनि पंचप्राण,
श्रमवीरांनो- नभीं फडकवा अपुले उंच निशाण.

आपण घडवूं नगरें सुंदर, उंच भव्य प्रासाद,
महासाठी- हें तलाव, धरणे बांधू या दिनरात.
या मातीशी अनन्य नातें अपुले धन्य इमान,
श्रमवीरांनो, नभीं फडकवा अपुले उंच निशाण

आपण काढूं हिरें, माणकें, धातू खोदुनि खाण,
धातू ओतुन यंत्रे घडवूं गात श्रमाचे गान,
निश्चित आहे भविष्य अपुले, सुखमय जीवनमान.
श्रमवीरांनो, नभीं फडकवा अपुले उंच निशाण

जवान आपण शस्त्रें घेउन सज्ज सिमेवरती,
किसान आपण शेतें पिकवूं या धरणीवरती,
श्रमदेवी तूं प्रसन्न होउनि दे आम्हां वरदान.
श्रमवीरांनो, नभीं फडकवा अपुले उंच निशाण.



"श्रमकल्याणयुग"
जुलै ८५



# पर्याय

श्रमवीरा तूं सदैव राही उभा रोवुनी पाय
परीश्रमाला कठोर आहे आज कुठें पर्याय ?


डोंगर दुर्गम फोडुन घाटावर वाटा बनवूं
वाळवंट, घनदाट वनांतुन चल शेतें पिकवूं
क्षण गेलेले कामांवाचुन परतुनि येतिल काय ?
परीश्रमाला कठोर आहे आज कुठें पर्याय ?

गाढ झोपल्या सिंहांच्या मुखें प्राणी शिरतिल काय !
बुडल्यांवाचुन सागरतळचे मोती मिळतिल काय ?
भगिरथयत्नें स्वर्लोकीची भूवर गंगामाय .
परीश्रमाला कठोर आहे आज कुठें पर्याय ?

श्रमसूर्याला अर्घ्य निथळत्या घामाचे द्यावें ,
श्वासोच्छ्वासांच्या तालांवर स्तुतीस्तोत्र गावें ,
जिथें श्रमाचा यश चेतला तेथें रामसहाय .
परीश्रमाला कठोर आहे आज कुठें पर्याय ?

श्रमकल्याणयुग जाने॰ ८५

# उन्हें एवढी कळली नसती



दिलें घेतलें चाचपणाऱ्या
हातांना जर डोळे असते;
तर वटिला पायखुणांचे
ओझे इतके झाले नसते.

श्वासांना जर हुंकारांची
अरबी भाषा कळली असती;
तर खडकावर लाट एकटी
दिवसाढवळ्या रडली नसती.

देतां घेतां ओठांना जर
कोण, कुणाचे? कळलें असते;
तर लोखंडी खांब दिव्यांचे
पावसांत पाझरले नसते.

छातीवरच्या दंशांना जर
वळवळणारी जिव्हा असती;
तर बुबुळाखाली जळजळणारी
उन्हें एवढी कळली नसती.

'साहित्य सौरभ' आकाशवाणी मुंबई जून ७२

# वेदनांनो या

या मुळें, या वेदनांना माझिया हृदयातुनी
शिंपिलें मी आसवांना पापण्यांच्या अंगणीं
सोबती निःश्वास माझे या तयांच्या मागुनी
क्षणभरी पण एक थांबा, कंठ येतो दाटुनी.

पांडवांच्या अज्ञवासा अंत होतां शेवटी
कां तुम्ही रे खंत करितां? का कुणी दावी भिती?
कोंडिले तुम्हांस ज्यांनी त्यांस द्या रे माहुनी
क्षणभरी पण एक थांबा, कंठ येतो दाटुनी.

हें निळे आकाश तुम्हांसारिखे आहे मुकें
सोसणें आसूढ सारे, बोलणें ना ठाउकें
स्फुंदते क्षितिजाचिया स्कंधावरी शिर टेकुनी
क्षणभरी पण एक थांबा, कंठ येतो दाटुनी.

आठवे का ती तुम्हाला, हात मेंदी-रंगलें?
कांचनी काया सुगंधी, हनुवटीवर गोंदलें
अधीर नयनें भारली, अभिसारली ओथंबुनी
क्षणभरी पण एक थांबा, कंठ येतो दाटुनी.

पिंपळाला ज्ञात सारे भेट होती चोरटी
चुंबिले, आलिंगिले अन जाहली लाटालुटी
आसवांचा पूर होता, रात्र होती चांदणी
क्षणभरी एक थांबा, कंठ येतो दाटुनी





# हें नभा

आयुष्य कोरडे आज संपुनी जावें,
अन जगात असल्या उद्यां न जन्मा यावें;
कर फिरला नाही म्हटली ना अंगाई,
मी बाळ कुणाचा, कुठली माझी आई ?
कुणि पदर झांकिला प्रेमळ अंगावरती ?
स्तनपान कधीं ना घेऊन मांडीवरती,
चिरगुट वीतभर कुणी न मजला दिधलें,
अन भूक पेटतां बोट कोरडे पुरलें.
लाभली जयांना अमृतमय वत्सलता,
ते धन्य खरोखर, पुण्यवान त्या माता,
मी एक पोरका तप्त वाळवंटात,
व्याकूळ लावूनी डोळे आकाशात.
तें तसेंच आहे माझ्यासम विकलांत,
शतयुगांपासुनी मुके कोंडुनी खंत,
नित शेज पहांटे निळे दुःख कुरवाळी,
चुपचाप दवांची दोन आसवें ढाळी.
हे नभा सांवळ्या कुशीत तुझिया यावें,
कवळून एकदा मजला तूं चुंबावें,
हळुवार सोडवूं मनोगतांच्या गांठी;
अन परस्पर्शांच्या फुंकूं जखमांवरती.

ळाळुन चालला सृष्टीचा संभार—
तू कुठे, कोणते दुःख अनिवार?
आषाढ दाटतां झरझर धारा झरती,,
निःशब्द हुंदके तुझेच ऐकूं येती.
हिणवीत हांसती सूर्य, चंद्रमा, तारे
अन दूर राहती गंधमारवले वारे
सोसून विजांचे कडकडतें आसूड
कोंडून चालला दुःख आपुलें गूढ.
चल दूर जांउ या पाश तोडुनी सारे,
मी येइन सोबत सोडुनी सर्व पसारे,
खोटीच शेवटी इथली माया ममता,
हें नांव गांव हा देह मुळाला नुसता.
ही नको बेगडी, खोटी दांभिक नातीं,
जी अखेर ठरली खडकावरली मातीं,
विझवून टाकिल्या स्वप्नांच्या फुलवातीं,
व्यवहारशून्य पण ठरलों ह्यांच्यासाठी.
चिरडून चंदनी स्वप्नें टाचेखाली,
मी अमृत होउन जपल्या ह्यांच्या वेली;
झाकून ठेविलें वादळ वाऱ्याखाली.
पण आज शिव्यांची फक्त मिळे ताखोली.
अंधार कोंदला ऐशा वादळराती,
मी वाट शोधली घेउन इवली पणती,
पण आज भडकला वणवा सभोवताली.
हा पुरता जाळिल कोमल नरुवर वेली.

मज नव्हतें कांहीं कुणांस मागायाचें;
मी कुंड जाळलें फुलत्या आकांक्षांचे,
अपमान – वादळें झेलुन माथ्यावरती,
मी उभा रोवुनी पाय सावलीसाठी.

मज कळलें, सारे फांसुन खोटे रंग,
मी खुळा, भाबडा भुललो झालो दंग,
ज्या कोमल हातें फुलें वाहिली फक्त,
त्या हातीं कांटे खुपसुन आलें रक्त.

हो रक्तमाखली ओंजळ भरुनी अश्रू –
प्राशून कसे मी सुकल्या कलिका विसरूं?
ह्या मुक्या वेदना तुझ्यांपुढे ओकून
आकाशा उरलें कोण मला तुजवीण?

जरी असेल त्यांना ह्यांतच परमानंद,
ठेचून काढु दे, देह पुढे सानंद,
फुलवीत तयांची स्वप्नें अर्धा जळलो,
मधुमंगल त्यांचे गाया अर्धा उरलो.

– घे परत आपुलें आयुष्याचें दान,
अन पुन्हा ईश्वरा नको पेटवूं रान,
मज नव्हतें माहित देशिल असलें देणें,
अंकूर कोवळें फुटणें, करपुन जाणें;

लखलाभ तुला, घे तूंच दिलेलें सारें,
तूं दुष्ट, नाहको लव हृदयींचे वारे,
मज नको तुझी ती दया, क्षमा अन् शांती,
तूं फक्त निखारे दिलेंस माझ्या हातीं.

आकाशमाउली, घे मजला पंखाशी,
कुरवाळ एकदां चुंबुनिया ओठांशी,
मी विलीन व्हावें तुझ्या ऊष्ण अश्रूंत,
अन माझें मीपण गूढ निळ्या मौनांत.

# बरें केलेंस केशवा

आम्ही मुवांतले किडे
नाही कशाची किळस,
दोन बोटांत दाबून—
नाक हुंगतो तुळस.


देवा तुला शिव्याशाप
दिले, "नाटकी नि दुष्ट"—
परी खरेंच राहूं दे
माझ्या कातडीचे कुष्ठ.

पडो डोक्यास भगदाड
होवो हाडांचा चुराडा,
मला नकोच कुणाच्या
शांतवनाचा शिंतोडा,

आज मसणवटीत
प्रेत चालतें बोलतें;
(-----माझे मीच मोचवीन)
खोटें रुसतें. हांसतें.

थोट्या हातांनी रचीन
चिता, लाकडें, गोवऱ्या,
तुम्हां शपथ; ढाळाल—
अश्रू, किर्तीच्या चवऱ्या.

बरें केलेंस केशवा!
माझा मजलाचि हेवा,
तुवां जितेपणीं आग
माझ्या लावीलीस रावा.



# झालो पूरा पूरा नंगा


कडेलोटाच्या क्षणांत
झालो पुराच नागवा,
आता धरून बांधून
मला घरांत नागवा.


तोलामोलाचे आयुष्य
तोल जातो कधीकधी,
मीहि दुबळा मनुष्य
उरी डसलेल्या व्याधी.

खराखरां खाजवून
कधी इसब मिकेल?
आतां गिधाडें खापोत
हाडमासांचा चिखल.

कैसा आयुष्याचा झाला
जगा वेगळा विनोद
जो तो लावीतो लेबल
"खुळा, पागल, पिसाट"

अगा, मला माफी द्यावी
तुझ्या नासविले रंगां,
असंगाशी केला संग
झालो पूरा पूरा नंगा.





"जुई" दिवाळी ८५


# दीप दे

रात्र काळ्या अंबराची दे, परंतू दीप दे,
दुःख दे देवा, परंतू सोसण्याचे धैर्य दे-

प्राक्तनाचा खेळ सारा, ना कुणाचा दोष हा,
पेरिले तें ये फळाला चारवणें आलें पहा,
पापण्या ओल्या न होतां भोगण्याचा मंत्र दे.
दुःख दे देवा, परंतू -------
कांपू दे धरणी, शिरावर कोसळो विद्युल्लता,
कडकडो दाही दिशा, ज्वालामुखाच्या पर्वता,
वादळें भेदून जाया शक्तिशाली पंख दे.
दुःख दे देवा, परंतू -------
एक श्रध्दा, एक निष्ठा, जिद्द मोठी, झेप मोठी,
लाभुं दे साम्राज्य अथवा येउं दे हाती करोटी;
अस्मितेची ज्योत माझी फक्त जळती राहुं दे.
दुःख दे देवा, परंतू ------



'भावसरगम' आकाशवाणी मुंबई आक्टोबर १९७२
संगीत- दत्ताराम गाडेकर गायक- विठ्ठल शिंदे



# मी सारें तुझिया चरणीं वाहिलें

मी सारं तुझिया चरणीं वाहिलें
दुःख असो आनंद असू दे
अश्रु असो वा हास्य असू दे
पापपुण्य कर्मात उगवले
ते सारं तुझिया चरणीं वाहिलें.
ओझें वाहून थकला माथा
खाली उतरून दे गुरुनाथा
कळतां नकळत मीच उचलले
ते सारं तुझिया चरणीं वाहिलें.
नको पुन्हा ते येणे, जाणे
द्वेष, प्रीतिचे उरी बोचणें
मुक्त मनाने मख पसरले
मी सारें तुझिया चरणीं वाहिलें.



जीवन विकास मे ८५

काव्यं २५८८७

# सुखाचे सोबती

सुखाचे सोबती सारे सुखाचे सोबती
निर्वाणीचा श्रीपती। तूंच देवा
क्षणांचे सोबती सारे क्षणाचे सोबती.

मायबाप, बंधू, जाया। लाविताति वेडी माया
दिवसरात्र झिजली काया। व्यर्थ देवा.

दिले घांस ज्यांच्या ओठीं। पुत्र, पौत्र, जाती गोती
कसें कुणी माझ्या पाठी। नाही देवा?

दिले जसें रूपरंग। वठवीले तैसें सोंग
सोंगामध्ये पोळे अंग। कां रे देवा?.

असंगाशि केला संग। नको तिथे झालो दंग
कसें शुध्द अंतरंग। आणू देवा?.

नश्वराचा अभिलाष। पुढे दिसे सर्वनाश
देहालागि आशापाश। ओढी देवा.

धनासाठी नाशवंत। किती केली आटाआट
जोडुनी रिकामे हात। आलो देवा.

संसाराचा व्यवहार। किती ताप घनघोर
नको पुन्हा पायीं दोर। बांधूं देवा.


"जीवनविकास" नागपूर

# शोधूं कुठें रे तुला ?

शोधूं कुठें रे तुला ?
निराकार, साकार, प्रासाद नाही
मतिमंद मज ज्ञान विज्ञान नाही.
शोधूं कुठें रे तुला ?
तू क्षेत्र, क्षेत्रज्ञ, तू कर्म, कर्ता
तू दृश्य, दृष्टी, तू सर्व-द्रष्टा
अदृश्य तू मात्र आम्हांस पाही.
मतिमंद मज ज्ञानविज्ञान नाही
शोधूं कुठें रे तुला ?
हे प्राणदाता, स्वयंसिध्द नाथा
हे केवलानंद स्वामी समर्था
अचलाचलाचा तू भारवाही
मतिमंद मज ज्ञान विज्ञान नाही
शोधूं कुठें रे तुला ?
तू काळ, विक्राळ, कुटिला, कठोरा
तू सत्य, संपूर्ण, संसारसारा
तू पाय, तू वाट, दाही दिशाही.
मतिमंद मज ज्ञान विज्ञान नाही
शोधूं कुठें रे तुला ?
अरूपारूपा तू हें निर्विकारा
तूं सर्वभूतात्मका, प्रेमधारा
निमिषार्ध माझ्या हृदयांत राही
मतिमंद मज ज्ञानविज्ञान नाही
शोधूं कुठें रे तुला ?



"जीवन विकास" ऑगस्ट ८५



# खरचटलेले पाय

खरचटलेले पाय रानांतल्या पाण्यांत
धुवायला नको होते.
धारांच्या गर्दीतून धावतांनासुद्धा
किती तहान लागते ?
डोंगरकपारीतून म्हणून का
हाका परत येतात ?
ढगांच्या आडोशाला
आकांतलेली किंकाळी
ऐकूनदेखील आभाळ
पांघरुण झालें नाही.
वाऱ्याला ओरबाडत सुटलेल्या
झाडांची तरी तीच गत.
आषाढ सरकवून नक्षत्रांचे सत्य
सांगायलाच पाहिजे का ?
जुनाट वडाची ओलसर पारंबी
हिंदोळते, तोंवर औदुंबराची फुलें
सहज वेचून होतील.

# मला कशाला दगड मारितां ?

मला कशाला दगड मारितां, करितां उपहास ?
मी तर माझे गूज सांगतो माझ्या हृदयास.
जनरितीचे वसन फेकुनी सोडियली लाज,
पाचोळा कवळिला, धुळीचा अंगावर साज,
मांडियला आकांत मोडक्या बुरुजावर आज,
मला एकटा टाकुन गेली माझी मुमताज,
तिजसाठी संन्यास घेतला आणिक वनवास,
मला कशाला दगड मारितां ----- ?

अजून ओल्या आठवणींनी भरलें निःश्वास,
तळहातांवर तोलुन तेव्हां होतें आकाश,
चार पावलांमध्ये थांबुनी ताऱ्यांची रास,
दिशा दिशांतुन दाटुन होता बहराचा मास,
त्या बहराचा क्षितिजावरती केवळ आभास,
मला कशाला दगड मारितां ----- ?


तुम्हांस तुमचे चंद्र, चांदणे होवो लखलाभ,
हंसा, हांसवा, खुशाल नाचा ना मजला क्षोभ,
वसंत, वर्षा, शरदाचा, ना शिशिराचा लोभ,
ग्रीष्म पेटला अश्वत्थाचे जळलेले कोंभ,
त्या कोंभांना भिजविल अपर्णे हा वेडा ध्यास,
मला कशाला दगड मारितां ----- ?

कां म्हणता ? हा कविहृदयांतल स्वप्नाचा गाव,
हें तर हळव्या तृणपात्यांवर पडलेले घाव,
हा ज्वालामुखि थांबत ना कितिं केला अटकाव,
लुप्त वेदनारसांत मारुन गलबलते भाव,
शब्द-स्वरांच्या पैलतटाचे ऐका निःश्वास,
मला कशाला दगड मारितां -----?

कशास देवा चहुबाजुंनी पेटविले रान ?
तुजपाशी का खरेंच इतुकी प्रेमाची वाण ?
जीवन कसलें ? हलाहलाचे दिलेंस तूं दान,
कपाळावरी एकदांच घण अखेरचा हाण,
पुढल्या जन्मीं नको आवळूं देवा गळफांस,
मला कशाला दगड मारितां ....!



तरुणभारत, नागपूर दिवाळी १९७०



# अंधाराने शाप दिला


अंधाराने शाप दिला पण सुर्याचे वरदान मला,
पायधुळीला वर भिरकावुन नक्षत्रांचा मान दिला.
सुर्याचे वरदान मला.

वैफल्याच्या अश्वत्थाला कैवल्याचा अर्घ दिला,
कर्दमातल्या कर्दळिला मी हिरण्यवर्णी गर्भ दिला,
धडधडत्या सरणावर एका शरीराला सन्मान दिला.
सुर्याचे वरदान मला.

भल्यांपहाटे तहानलेल्या कलिकेला दंवबिंदु दिला,
क्षुधार्त एका उपमन्यूच्या मुखीं दुधाचा सिंधु दिला.
वादळविद्धा अमावसेला चंद्रम गोरापान दिला.
सुर्याचे वरदान मला.

ग्रहगोलांचा वेचा उचलून क्षितिजाला हलकेंच दिला,
अगतिक ओल्या हिमशिखरांना मेघांचा शिरपेंच दिला,
मळलेल्या निळवंताला धूमकेतुचा बाणं दिला,
सुर्याचे वरदान मला.

प्रारब्धाला मौनासोबत माथ्यावर मधुपर्क दिला,
बुबुळांतळच्या स्वप्नांवरती एक रुपेरी वर्ख दिला,
ठिगळ नेसल्या आयुष्याला पितांबराचा वाण दिला.
सुर्याचे वरदान मला.



# आशीर्वाद

आवर्त गरगरे ताडव करती लाटा,
घनदाट धुक्यातुन लपून बसल्या वाटा,
अंवसेचे काजळ दिशादिशांतुन भिनलें.
नावेंत तळाशी फुटून पाणी शिरलें.

रक्ताचा सान्या गार बर्फ झालेला,
मी तोंड झांकुनी गलितगात्र भ्यालेला,
स्वप्नांची वाकळ कवटाळुन पोटाशी,
भांबावुन बसलो गाळित अश्रुजलासी.

त्याक्षणीं अचानक आठवला आदेश,
अन भुजाभुजांतुन संचरला आवेश,
तूं उभाच पुढती होउन दीपस्तंभ,
जणुं वर्षत होता आशेचे मधुकुंभ.

विकराल भयंकर तुफान लाटांतून,
तव नांव घेउनी दिले अंग झोकून,
उत्तुंग यशाचे होते वेड मनाला,
अन पाणी कापित आलो पैलतिराला.

तूं म्हटलें, "ऐसें आयुष्याचे नाणें—
हांसणें खदखदां कधीं, कधी रडगाणें;
हा गोफ गुंफिला आशा आणि निराशा,
सुख-दुःख-विणेच्या तारांमधली भाषा.

त्या तूंच वर्षल्या लख्ख प्रकाशांमधुनी
मी जाइन सारे पर्वत ओलांडुनी,
ती किरणशलाका तुझाच रे तळहात
माझ्यावर ओती अमृत-आशीर्वाद.

"विवेक" दिवाळी ७०

# रसिकांनो

रसिकांनो, म्हणतां किती आर्त ह्या कविता ?
धगधगे अंतरीं एक पेटता पलिता
कुणि फुंकर घाली कुणी तेल ओतीत;
अंगार तेथला प्रगटे मग ओठांत.

कां असे बोलतां ? "कल्पनेतले सारे—
खोटेंच वाहती कविहृदयांतुन वारे—"
आषाढ दाटतो तेंव्हा आकाशाला —
गहिंवरुनी येतें, जपतो अश्रू-माला.

मी प्रेम मानितो दिव्य सुवर्णावस्था
हृदयाने हृदयांगावी अमृतगाथा,
शिव, सत्य, सौरभी, सुंदर मानसमुक्ता
निर्वाज सदा ती रंग रंगुनी माया.

वाटलें, चंदनी सुर्यफुलांचे वेड
पुरवील भाबड्या मनिंचे अवघे कोड,
पण एक जिव्हारीं कोसळला आघात
अन हाय! उडाली विस्करून शकलें सात.

हा असाच राहो हृदयावरती घाव,
त्यामुळे तियेचे ओठावरती नांव;
हें रक्त वाहू द्या भळाभळा, ना खंत,
मी तेंच प्राशुनी खरेंच होतो शांत

ही अशी वेदना लाभो जन्मोजन्मीं,
मन गुंतुन राहो सदैव तिचिया नामीं;
होईल जेधवां रवि-रात्रीची भेट,
तेव्हांच पडावी तिची नी माझी गांठ.



# घुंगुर टिपऱ्या वाजती वाजती

घुंगुर टिपऱ्या वाजती वाजती
गोप गोपिका नाचती नाचती

मोरपिसांना कोण ग ल्यालेला?
घुमवित पावा कोण ग आलेला?
यशोदेचा मोर बाई सांवळा

झिम्मा खेळे राधेच्या सांगाती
घुंगुर, टिपऱ्या वाजती वाजती

युवकांनो या प्रौढांनो या रे या
युवतींनो या महिलांनो सारे या
थोर धाकले काळे या गोरे या

भेदभावना इथे कुणी ना जाणती
घुंगुर टिपऱ्या वाजती वाजती

जातीबंधन सोडीले सोडीले
धर्मकुंपणां मोडीले मोडीले
लिंगभेदही तोडीले तोडीले

जीव जिवाचा सोयरा सोबती
घुंगुर टिपऱ्या वाजती वाजती

थंड वारा अंगाला झोंबतो
दंग होऊनी कदंब, आतां डोलतो
यमुनेकांठी रास हा रंगतो

सूर ताल हे साऱ्यांना बाहती
घुंगुर टिपऱ्या वाजती वाजती

माळगळीला जाऊं द्या, जाऊं द्या
नवी पालवी येऊं द्या, येऊं द्या
रानफुलांनी बहरूं द्या , डंवरूं द्या

नवीनतेला गाऊंया आरती
घुंगुर टिपऱ्या वाजती वाजती

चंद्रचांदण्या जागुनी थकल्या
क्षितिजापाशी येउनी टेकल्या
धुकें लपेटुन झोपल्या झोपल्या

दिशादंवातुन न्हाहती न्हाहती
घुंगुर टिपऱ्या वाजती वाजती

सदा सर्वदा काय हो टिकले ?
दुःख कधी का कोणाला चुकले ?
आनंदाचे कण हे इवले

परस्परांना वाटुनी वाढती
घुंगुर टिपऱ्या वाजती वाजती

इथे कुणाला नाचायाचे नाचूं दे
आम्ही थकलो आम्हाला जाऊं दे
जन्मसोंग हे काढुनी ठेवूं दे

पुन्हा यायचे फेर धराया भोवती
घुंगुर टिपऱ्या वाजती वाजती



# श्रेय

श्री· मा·गो· कुलकर्णी, महाप्रबंधक अनुरक्षण, दुरसंचार विभाग, पश्चिम क्षेत्र, मुंबई.
श्री· मा·कृ· कुलकर्णी, क्षेत्रीय अभियंता(निवृत्त) दुरसंचार विभाग पश्चिम क्षेत्र, मुंबई.
श्री चाको, उपमहाप्रबंधक, अनुरक्षण, दुरसंचार विभाग, पश्चिम क्षेत्र, मुंबई.
डॉ· प्रा· रमेश तेंडुलकर, मराठी विभागप्रमुख, किर्ती महाविद्यालय, मुंबई.
श्री· विजय विठ्ठलराव राणे, श्री· विलास विजयराव राणे.
श्री· जगदीश अगरवाल, श्री· कुट्टी, आणि जॉली प्रिन्टर्स

श्री· चित्तरंजन घोटीकर, सौ· सुलोचना घोटीकर.
श्री· प्रभाकर अत्रे, द·भा· धामणस्कर.
श्री· विजयानंद मराडकर, श्री दत्ताराम बारस्कर.
काव्यरसिक मंडळ, डोंबिवली.
सौ· माधवी आचार्य, सौ· सुधा मोकाशी, सौ उषाताई पेंडसे.

श्री· यशवन्त देव, श्री· प्रभाकर पंडीत, श्री· बाळ चावरे.
श्री· बबनराव काळे, श्री· प्रफुल्ल चेऊळकर, श्री· माधव कुलकर्णी.
श्री· आकाशानंद, श्री· शांकनील, श्री· जयवन्त कुलकर्णी.
सौ· अपर्णा मयेकर, सौ· पुष्पा पागधरे.

मुंबई मराठी ग्रंथसंग्रहालय सर्वशाखाप्रमुख
महाराष्ट्रातील सर्व ग्रंथालय प्रमुख.
सर्व शाळा महाविद्यालयांचे ग्रंथालय प्रमुख
आणि रसिकवृंद

आभारपूर्वक नम्र अभिवादन
'यशवन्त' पारखी.
सौ· विजया पारखी.

# धन्यवाद!

रसिक वाचकांच्या हाती आषाढ-श्रावण देतांना पराकोटीचा विलंब झाल्याबद्दल प्रथम सर्वांची मनापासून क्षमा मागते, अनेक अकल्पित-अडचणीमुळे पुस्तक पूर्ण व्हायला विलंब होत गेला. 'रक्षाबंधन' ८५ साली-प्रकाशित झाल्यानंतर लगेच आषाढ-श्रावणाच्या पूर्वतयारीला लागलो. फारतर वर्षभरात छापून तयार व्हावं या अपेक्षेने परंतु योग नव्हता.

कल्पना नव्हती इतका प्रतिसाद रक्षाबंधन या संग्रहाला मिळाला कारण अक्षरगणवृत्ताच्या धाटणीची कविता पसंत करणारा रसिकवर्ग अजून खूप आहे. छंद लयीत बांधलेली साधी सोपी कविता अजून रसिक मनाची पकड घेते हे अनेकदा आमच्या ध्यानात आले, अशा अनेक कविता स्पर्धांमधून पुरस्कृत झाल्या, साहित्यसंमेलने, आकाशवाणी व दूरदर्शनवर गाजल्या.

परंतु मराठी कवितेला एकूण फार वाईट दिवस आले आहेत. प्रकाशक कवितासंग्रह छापायला घेत नाहीत कारण खप नसल्याने परवडत नाही. साहित्य संमेलनातून देखील कवितावाचनाच्या कार्यक्रमांची काय अवस्था होते हे आपण दरवर्षी पाहतोच. कवितेची मासिके बंद पडताहेत. खरोखरच विचार करायला लावणारी एकूण परिस्थिती आहे. कवितेबद्दल मराठी वाचकांच्या घोर गैर-समजामुळे चांगल्या कवितेकडे सुजाण रसिकांचे लक्ष वेधायला वर्षानुवर्षे योग येत नाही. असो, या विषयावर जास्त बोलण्याचा आमचा अधिकार नाही. मराठी सारस्वतांतील समर्थ नक्कीच विचार करीत असतील आणि योग्य उपाय योजतील.

'आषाढ-श्रावण' श्रीगणेश साहित्यधारेचे तिसरे पुस्तक. पुस्तक छपाई खूप महागली आहे परंतु आमचा संकल्प महागाईहून मोठा आहे कागदाच्या खरेदीपासून पुस्तक बांधणीपर्यंतच्या सर्वच टप्प्यावर आम्हाला पुरेसे सहकार्य मिळत गेले म्हणून शक्य तितक्या अल्प किंमतीत पुस्तक देता आले. हा सहकार्याचा ओघ आमच्याकडे पाहून नव्हे तर कवितेकडे पाहून आमचेकडे वाहत आला आहे. याची पूर्ण समज आम्हाला आहे म्हणून संपूर्ण श्रेय ते कवितादेवतेचे आणि रसिक देवांचे,

धन्यवाद!

सौ. विजया यशवन्त पारखी.
प्रकाशिका

REFBK-0025986

REFBK-0025986